


महाराष्ट्राचे जिल्हे

महाराष्ट्राचे जिल्हे

किंमत—२५ नवे पैसे

बुलडाणा

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धी खात्याचें प्रकाशन

शासन मुद्रणालय, नागपूर

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिचय

बुलडाणा जिल्हा

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

बुलडाणा जिल्हा

(१) परिचय

कोणालाहि अभिमान वाटावा असे या जिल्ह्याला इतिहासांत महत्त्वाचें व स्फूर्तीचें स्थान प्राप्त झाले आहे. शौर्य, कीर्ति व वैभव यांची स्मारकें या जिल्ह्यांत थोडीथोडकी नाहीत. असामान्य राजपुरुष, स्वराज्य संस्थापक, महाप्रतापी श्री छत्रपति शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाबाईचे माहेर याच जिल्ह्यांत आहे.

मोंगल व निजाम-उल्-मुल्क यांच्यांतील इतिहासप्रसिद्ध फत्तेखेडर्याची लढाई, सिंदखेडची लढाई, रोहिणखेडची लढाई वगैरे याच जिल्ह्यांत झालेल्या आहेत. यादवांचे मंत्री 'हेमांद्री' यांच्या मार्गदर्शनाखाली बांधलेली मंदिरे या जिल्ह्यांत आजहि तग धरून आहेत.

प्रसिद्ध संत पुरुष चोखामेळा याचा जन्म 'मेहुणा' या खेडयांत झाल्याची विद्वान लोकांत चर्चा आहे व त्यासंबंधी संशोधन चालू आहे असे समजते. विदर्भांत सर्वांत श्रीमंत गणले जाणारे देवस्थान देऊळगांवराजा येथे आहे.

मेहकरच्या बालाजी मंदीरांत १०॥ फूट उंचीची बालाजीची मूर्ति १८८८ पासून भाविकांचे श्रद्धास्थान बनली आहे.

गजानन महाराजांचे शेगांव येथील मंदीर फक्त महाराष्ट्रीयांचेच श्रद्धास्थान बनलेले नाही तर तेथे भारतांतील असंख्य भाविकांचा प्रवाह सतत वाहत असतो. तसेच गोमाजी महाराजांची समाधि असलेले श्रीक्षेत्र नागझरी हेंहि याच जिल्ह्यांतील एक वैशिष्टयपूर्ण स्थान आहे.

नयनमनोहर सौंदर्य वनश्रीयुक्त जळगांव तालुक्यांतील आंबाबारवा व भींगारा हीं थंड हवेची ठिकाणें या भागांतील लोकांचे आकर्षण बनली आहेत.

लोणार येथील खाऱ्या पाण्याचे सरोवर अतिप्राचीन काळापासून सुपरिचित आहे. अखंड वाहत असलेली 'धार' हे या ठिकाणचे एक विशेष नाविन्य होय. भगवान विष्णूनें लवणासूराचा पराभव केला त्या विजयाचें प्रतिक म्हणून बांधलेले दैत्यसूदन मंदिर तत्कालीन शिल्पकलेची व स्थापत्य शास्त्राची प्रगति दर्शवितें.

जिल्ह्याचे मुख्यालय, बुलडाणा, आल्हादकारक हवामानामुळें क्षयरोग्यांकरितां आरोग्यधाम बांधण्यास उचीत ठरले.

नागपूर विभागांतील सात प्रमुख सिंचन योजनांपैकी नळगंगा योजना, या जिल्ह्याच्या वाटयाला आलेली आहे. या प्रकल्पामुळें केवळ शेतकी उत्पादनच वाढणार नसून औद्योगिक कार्याचाहि विकास होईल व स्थानिक लोकांचे जीवनमान वाढविण्यास प्रामुख्याने मदत करील. औद्योगिक क्षेत्रांत या जिल्ह्यांतील विणकामाचा गृहोद्योग अग्रगण्य म्हणता येईल. खामगांव येथील कापूस बाजारपेठ महाराष्ट्रांतील पहिल्या प्रतीची बाजारपेठ म्हणून गणल्या जाते.

साबण, वनस्पति तूप, फिनाईल, औषधि तयार करण्याचे कारखानेहि या जिल्ह्यांत निरनिराळ्या ठिकाणीं आहेत.

(२) नैसर्गिक रचना

बुलडाणा जिल्हा उत्तरेस १९°५१′ व २१°१७′ अक्षांश आणि ७६°४९′ व ७५°५७′ रेखांशामध्यें पसरलेला असून त्याने ३,७७३ चौरस मैलांचे क्षेत्र व्यापलेले आहे. या जिल्हयांत एकूण १,१७९ गांवें असून ९ नगरें आहेत. जिल्हयाच्या एकूण १,०६२,३९१ लोकसंख्येपैकीं पुरुषांची संख्या ५४३,२२८ असून स्त्रियांची संख्या ५१९,१६३ आहे. यापैकी सुमारे ६ लाख लोक शेतीचा धंदा करतात. या जिल्हयांत कुणबी, लेवा पाटील, निहाल, कोरकू, लमाणी, बंजारा, वंजारी हे लोक मुख्यत: राहतात.

१८५३ सालीं विदर्भांतील मेहकर, चिखली आणि मलकापूर या तालुक्यांचा एक गट करून त्याला **पश्चिम विदर्भ जिल्हा** म्हणूं लागले व पुढे त्यास १८६४ सालीं नैऋत्य विदर्भ जिल्हा म्हणून संबोधू लागलें. कांहीं कालानंतर त्याला मेहकर जिल्हा हे नांव देण्यांत आलें.

जिल्हयाचे प्रमुख ठिकाण म्हणून बुलडाण्याची निवड प्रथमत: १८६७ मध्यें करण्यांत आली व अकोला जिल्हयांतील खामगांव व जळगांव हे तालुके इ. स. १९०५ मध्यें या जिल्हयांत विलीन करण्यांत येऊन त्यांस सध्याचें स्वरूप प्राप्त झाले. आतां त्याचा आकार साधारणत: लांबट त्रिकोणासारखा आहे.

या जिल्हयाच्या उत्तरेला जळगांव व नेमाड, पूर्वेला अकोला, दक्षिणेला परभणी आणि पश्चिमेला औरंगाबाद हे जिल्हे आहेत.

या जिल्हयांत उत्तर भागीं म्हणजे जळगांव तालुक्यांत सातपुडा पर्वताचे फाटे आणि दक्षिण भागीं चिखली व मेहकर तालुक्यांत अजिंठा पर्वत पसरलेला आहे.

मलकापूर, खामगांव व जळगांव तालुक्यांची उंची समुद्रसपाटीपासून साधारणत: ८६५ ते ९१० फुटापर्यंत आहे. मलकापूर व नांदूरा समुद्रसपाटीपासून अनुक्रमें ९०० व ८६५ फूट उंचीवर वसलेली आहेत. चिखली व मेहकर तालुक्यांची उंची समुद्रसपाटीपासून १,७३६ फूट ते २,४१५ फुटांच्या दरम्यान आहे.

बुलडाणा हे नगर समुद्रसपाटीपासून २,१९० फुटावर वसलेले आहे.

पर्जन्य व हवामान

या जिल्हयांत पाऊस विशेषत: जून ते सप्टेंबर अखेरपर्यंत नैऋत्येकडून इशान्येकडे वाहणाऱ्या मान्सून वाऱ्यापासून २५ ते ३५ इंचापर्यंत पडतो.

मेहकर तालुका सोडल्यास इतर तालुक्यांत ज्वारी व कापूस हीं प्रमुख पिकें आहेत. मेहकर तालुक्यांत प्रामुख्याने गहू, हरबरा, करडी, जवस, कऱ्हाळ या रब्बी पिकांची लागवड होते.

बालाघाट पठारावर असलेले मेहकर व चिखली तालुक्यांचे हवामान शीतल आहे. या तालुक्यांत उन्हाळा उशीरा सुरू होतो. इतर तालुक्यांचे हवामान उष्ण आहे.

बुलडाणा गांवाचे हवामान मात्र इतर ठिकाणापेक्षां थंड **असते.** मे महिन्यांत जास्तीत जास्त सरासरी उष्णतामान १०५° असते व कमीत कमी सरासरी उष्णतामान ८०° असते. नोव्हेंबरमध्यें जास्तीत जास्त सरासरी उष्णतामान ८४° व कमीत कमी सरासरी उष्णतामान ६५° असते.

नद्या

पैनगंगा हीच या जिल्हयांतील मुख्य नदी होय. ती देऊळघाटांत उगम पावून आग्नेय दिशेने मेहकर तालुक्यांतून अकोला व चांदा जिल्हयांत प्रवेश करून गोदावरी नदीला मिळते. ही नदी या जिल्हयांत उन्हाळयांत कोरडीच असते. दुसरी महत्त्वाची नदी म्हणजे काटेपूर्णा. ती या जिल्हयाच्या पश्चिमेस असलेल्या अजिंठा पर्वतांत उगम पावून देऊळगांवच्या उत्तरेस पैनगंगा नदीला साधारणत: समांतर वाहत जाते. अमरावती जिल्हयाच्या गावीलगड टेकडयांच्या पायथ्याशी उगम पावणारी पूर्णा या जिल्हयांतून पश्चिमेकडे वाहत जाते. तिला साधारणत: बाराहि महिने पाणी राहते. याशिवाय या जिल्हयांत नळगंगा, विश्वगंगा, ज्ञानगंगा, जळगंगा, बानगंगा, बोरडी, मास इत्यादि नद्या आहेत. त्यांपैकी नळगंगा नदी बुलडाणा नजीकच्या देऊळघाट डोंगरांत उगम पावून उत्तरेकडे वाहत गेल्यावर मलकापूरनजीक पूर्णा नदीला मिळते.

वनस्पति व पशुजीवन

या जिल्ह्यांतील वनस्पति दोन भागांत विभागली जाते—(१) सखल प्रदेशांत वाढणारी, व (२) डोंगरावर वाढणारी.

जिल्ह्यांतील एकूण ४१३ चौरस मैलांचे क्षेत्र जंगलाने व्यापले आहे. म्हणजे जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळांपैकी ११ टक्के भागांत जंगल पसरलेले आहे.

बाभळीचें हे झाड या जिल्ह्यांत साधारणतः कुठेहि दृष्टीस पडते. निंब, हिवर, येलान्नी, हिंगण, जिल्ह्यांत असून सर्पणाकरितां उत्तम आहे.

आंबे, चिंच, बोर, पिंपळ, शिंदी यांचीहि झाडें भरपूर प्रमाणांत आहेत. डोंगरी भागावर प्रामुख्याने अंजन वाढतांना दिसून येते. याच्या पानाचा उपयोग पौष्टिक चारा म्हणून करण्यांत येतो. तिवस, शीशम, खैर, पळस, घाटबोर इत्यादि झाडेहि दृष्टीस पडतात. गेरुमाटरगांव या राखीव जंगलांत चंदनाची झाडेहि आहेत. त्याचप्रमाणें निर्गुडी, करंज, लोखण्डी, काहू, मोह इत्यादि झाडेहि आहेत. फळांकरितां व सावलीकरितां आंबे, निंब, बकान, गुलमोहर, विलायती बाभूळ, विलायती आलमरस, कान्त, वेल इत्यादि झाडांची लागवड करतात. तसेंच मेहंदी, नागफणी, सागरगोटी, शहाडा, बोर, पौना, हरळ, कुंदा यांची चाऱ्यासाठीं व कुंपणासाठी लागवड करण्यांत येते.

या जिल्ह्यांत वाघ क्वचितच दृष्टीस पडतो. परंतु, बिबटे वगैरे बऱ्याच प्रमाणांत आहेत. पूर्वी घाटबोरी जंगलांत त्यांची संख्या फार होती. अजिंठा पर्वतांत चित्ताहि दृष्टीस पडतो. रानबोक्या, मुंगस, कोल्हा, तडस, लांडगे, हरिण व ससे वगैरे मात्र बऱ्याच प्रमाणांत दिसतात.

काळ्या तोंडाची वानरें सर्वत्र उनाडतांना दृष्टीस पडतात. मोर, ससाणा, कोकीळ हे सहज दृष्टीस पडणारे पक्षीहि या जिल्ह्यांत बऱ्याच प्रमाणांत आहेत. निळी व पांढरी कबुतरेहि दिसतात, तसेच जहरी साप नेहमी इतस्ततः सळसळतांना नजरेस पडतात.

(३) शासन व्यवस्था व सामान्य माहिती

बुलडाणा जिल्ह्याच्या ३,७७३ चौरस मैलांच्या क्षेत्रफळापैकी ३,७५४ चौरस मैल भाग ग्रामीण वस्तीने व्यापलेला आहे. १९६१ च्या शिरगणतीनुसार या जिल्ह्याची लोकसंख्या १,०६२,३९१ असून त्यापैकी पुरुष ५४३,२२८ व स्त्रियां ५१९,१६३ आहेत. ही लोकसंख्या १,१७९ खेड्यांत व ९ नगरांत विखुरलेली आहे.

या जिल्ह्यांतील मुख्य भाषा मराठी असून ८३ टक्के लोक मराठी बोलतात.

जिल्हाधिकारी हे जिल्ह्यांतील मुलकी खात्यासंबंधी न्यायाचें काम पाहतात. त्यांचे कार्यालय जिल्ह्याचे प्रमुख ठिकाणी म्हणजे बुलडाणा येथे आहे.

प्रशासन

प्रशासकीयदृष्ट्या उपविभाग पदाधिकारी हा तालुक्याचा प्रमुख राजस्व अधिकारी समजण्यांत येतो. त्याच्या हाताखाली प्रत्येक तहसिलीला एक तहसीलदार व त्याला सहाय्यक म्हणून दोन अगर जास्त नायब-तहसीलदार देण्यांत आले आहेत.

तहसिलीचें विभाजन पुढे राजस्व मंडळांत केलेलें आहे. प्रत्येक राजस्व मंडळास एक राजस्व निरीक्षक दिला आहे. खेड्यांचा कारभार ज्या त्या गांवचा पाटील व ग्रामपंचायतच्या मार्फत चालतो.

जिल्ह्यांतील तालुके

तालुका	प्रमुख गांव
(१) चिखली	... ... चिखली.
(२) मेहकर	... ... मेहकर.
(३) मलकापूर	... ... मलकापूर.
(४) खामगांव	... ... खामगांव.
(५) जळगांव	... ... जळगांव (जामोद.)

नगरपालिका असलेलीं गांवें

(१) बुलडाणा.
(२) चिखली.
(३) देऊळगांवराजा.
(४) मेहकर.
(५) खामगांव.
(६) शेगांव.
(७) जळगांव.
(८) मलकापूर.
(९) नांदुरा.


तालुक्यांची भौगोलिक रचना व इतर माहिती

(१) चिखली तालुका

हा तालुका २०° व २०°३७′ उत्तर अक्षांश आणि ७५°५७′ व ७६°४२′ पूर्व रेखांशात पसरलेला आहे. त्याचे क्षेत्र ९२४ चौरस मल आहे. या तालुक्याचे पूर्वी देऊळघाट असें नांव होते. याच्या उत्तरेस मलकापूर तालुका, पूर्वेस खामगांव व मेहकर आणि दक्षिणेस औरंगाबाद जिल्ह्यांतील जालना हे तालुके आहेत


या तालुक्यांत नैऋत्येकडील भागांत अजिंठा पर्वताच्या टेकड्या पसरलेल्या दिसतात. या तालुक्याची उंची समुद्रसपाटीपासून १,८०० फूट असून याचा उतार आग्नेय दिशेकडे आहे. इतर तालुक्यापेक्षां या तालुक्याचे हवामान शीतल आहे. यांत तीन नगरें असून २६० खेडीं आहेत. चिखली, बुलडाणा व देऊळगांवराजा या ठिकाणीं नगरपालिका आहेत. मुख्य नदी पैनगंगा असून ती पूर्वेस वाहत जाते.

शासन व्यवस्था-



तहसील ○
तहसीलचे नांव -
नगरपालिका असलेलीं गांवें
राजस्व कचेरी □
पोलीस उपविभाग-
पदाधिकारी कार्यालय
मुख्यालय व पोष्ट कचेऱ्या ▲
जिल्हा न्यायालय
अपर जिल्हा न्यायालय
जळगांव
मलकापूर
नांदूरा
शेगांव
खामगांव
बुलडाणा
चिखली
मेहकर
देऊळगांवराजा
सिंदखेड राजा

भौगोलिक रचना.


पहाड
नदी
पुर्णा नदी
जळगांव
इदरखेड
मलकापूर
दाताळा
चांदूर
नांदूरा
नीमखेड
टाकरखेड
पिंपळगाव
जळगांव
बुलडाणा
सुदाने
खामगांव
नानोरी
अजिंटा पहाड
अजिंठा
देऊळघाट
चिखली
पैनगंगा नदी
अजिंठा पहाड
ब्रम्हपुरी
मेहकर
पैनगंगा नदी

हा तालुका पूर्वी अकोला जिल्हयांत होता. १९०५ सालीं त्याचा या जिल्हयांत समावेश करण्यांत आला. हा तालुका २०°२६′ व २०°५५′ उत्तर अक्षांश आणि ७६°३२′ व ७६°४८′ पूर्व रेखांशांत पसरलेला आहे. आकोला जिल्हयांतील बाळापूर तालुक्यांतून १४८ गांवें वेगळी करून १८७० सालीं खामगांव तालुका निर्माण करण्यांत आला व नंतर १८७२ सालीं त्याचा विस्तार करण्यांत आला. सध्या या तालुक्यांत २०९ खेडीं असून २ नगरें आहेत. क्षेत्रफळ ७१० चौरस मैल आहे.

(२) खामगांव तालुका

या तालुक्याच्या उत्तरेस जळगांव तालुका, पूर्वेस बाळापूर, दक्षिणेस चिखली आणि पश्चिमेस मलकापूर तालुके आहेत. मध्यभाग सुपीक व सपाट, दक्षिण भाग डोंगराळ असून त्यांत अजिंठा पर्वताचे कांही फाटे पसरलेले आहेत. या तालुक्यांतील पूर्णा, म्हैस, मन, मास, बोर्डी व ज्ञानगंगा ह्या नद्या प्रमुख आहेत. त्यापैकी म्हैस, मन, मास, बोर्डी व ज्ञानगंगा ह्या नद्या दक्षिण भागांतील अजिंठा पर्वतांत उगम पावतात.

या तालुक्यांतील जमुना व गेरूमाटरगांव तलाव विशेष उल्लेखनीय आहेत. येथील हवामान साधारणतः उष्ण आहे.

या तालुक्याच्या उत्तर कडेवर बाभळीचें जंगल आहे.

हा तालुका २०°६५′ आणि २१°१३′ उत्तर अक्षांश आणि ७६°२३′ व ७६°४८′ पूर्व रेखांश ह्यांत पसरलेला आहे. त्याचे क्षेत्रफळ ४७४ मैल आहे. या तालुक्यांत एकूण १६१ खेडीं व एक नगर आहे. हा १९०५ सालीं अकोला जिल्हयांतून अलग करून या जिल्हयाला जोडला गेला. याच्या उत्तरेस नेमाड जिल्हा, पूर्वेस अमरावती व अकोला जिल्हा, दक्षिणेस खामगांव व मलकापूर तालुके आणि पश्चिमेस जळगांव जिल्हा हे आहेत.

(३) जळगांव तालुका

याच्या उत्तरेस सातपुड्याचें फाटे पसरलेले आहेत. त्यांना मैलगड, जटाशंकर व मांगेरीचें डोंगर ह्या नांवानें संबोधिले जाते.

सुपीक जमिनीबद्दल हा तालुका नागपूर विभागांत प्रसिद्ध आहे. ह्या तालुक्यांतील कापूस पिकविणारी काळी जमीन सुप्रसिद्ध आहे. तसेंच या तालुक्याच्या उत्तर भागांत आंबाबारवा नांवाचे राखीव जंगलहि आहे.

या तालुक्यांतील मुख्य नदी बाणगंगा होय. दक्षिण सरहद्दीवरून पूर्णा नदी पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहते. ह्याशिवाय ह्या तालुक्यांत नाल्यांची संख्या फार आहे. हा तालुका विड्याच्या पानासाठीहि प्रसिद्ध आहे. या तालुक्यांतील आसलगांव, पिंपळगांव, सुनगांव, सोनाळा, बावनवीर इत्यादि प्रमुख खेडीं आहेत.

हा तालुका २०° ३३′ आणि २१° २′ उत्तर अक्षांश व ७६° २′ व ७६° ३६′ या पूर्व रेखांशांत पसरलेला आहे. याचे क्षेत्रफळ ६५१ चौरस मैल असून त्यांत २३८ खेडीं आणि दोन **शहरें आहेत.** या तालुक्याच्या उत्तरेस नेमाड जिल्हा, पूर्वेस खामगांव तालुका, दक्षिणेस चिखली तालुका आणि पश्चिमेस जळगांव जिल्हा आहे. या तालुक्याच्या दक्षिण भागीं अजिंठ्याचें फाटे पसरलेले आहेत.

(४) मलकापूर तालुका

या तालुक्याच्या उत्तर सरहद्दीवरून पूर्णा नदी वाहते. याशिवाय दक्षिण भागांतून नळगंगा, विश्वगंगा, जळगंगा, ज्ञानगंगा इत्यादि नद्या वाहतात. ह्या तालुक्यांतील नळगंगा नदीवर धरण बांधण्यांत येत आहे.

या तालुक्यांतील जमीन थोडा डोंगराळ भाग सोडल्यास सुपीक आहे.

(५) मेहकर तालुका

हा तालुका १९° २′ व २०° १५′ उत्तर अक्षांश व ७६° २′ व ७६° ५२′ पूर्व रेखांशांत पसरलेला असून त्याचे क्षेत्रफळ १,००७ चौरस मैल आहे. या तालुक्याच्या उत्तरेस खामगांव व चिखली, दक्षिणेस परभणी जिल्हा, पूर्वेस अकोला जिल्हा आणि पश्चिमेस चिखली तहसिल आहे.

या तालुक्याची भूरचना साधारणतः चिखली तालुक्यासारखी आहे. पैनगंगेकांठची जमीन तिच्या गाळामुळे सपाट व सुपीक बनली असून बाकीची सर्व जमीन डोंगराळ आहे.

या तालुक्यांत गव्हाचे पीक इतर तालुक्यांच्या मानाने बऱ्याच प्रमाणांत काढलें जातें.

डाक व्यवस्था

बुलडाणा येथें मुख्य डाकघर असून बाकीच्या ठिकाणीं उप-डाकघरें आहेत. या जिल्ह्यांत एकूण २३६ डाकघरें आहेत. बुलडाणा, चिखली, मेहकर, खामगांव, शेगांव, नांदुरा, जळगांव व मलकापूर हे परस्परांशी दूरध्वनीद्वारे जोडलेले आहेत. तसेच देऊळगांवराजा येथें तार करण्याची व्यवस्था आहे. बुलडाणा, शेगांव मलकापूर व खामगांव येथून देवनागरी लिपींतून मराठी व हिंदीमध्यें तार करण्याचीहि सोय झालेली आहे.

पोलीस यंत्रणा

वैयक्तिक स्वातंत्र्य अबाधित राहावे आणि कायदा व समाज-जीवन सुसंगत आणि सुरक्षित रहावे म्हणून पोलीस यंत्रणा उभारण्यांत आली असून तिचे मुख्य कार्यालय बुलडाणा येथे आहे. बुलडाणा जिल्हा पोलीस शासनासाठी खामगांव उपविभाग व बुलडाणा उपविभाग यांत विभागलेले असून त्याचे काम पाहण्यासाठी पोलीस उपविभाग पदाधिकाऱ्यांची नेमणूक केलेली आहे.

न्यायालयीन व्यवस्था

बुलडाणा येथें जिल्हा सत्र न्यायाधीश (प्रमुख न्यायाधीश) यांचें कार्यालय असून त्यांत फौजदारी आणि दिवाणीविषयक न्यायदानाचें काम चालते. तालुका पातळीवरहि न्याय-दानासाठी अधिकारी असतो. अपर जिल्हा सत्र न्यायाधिशांचे कार्यालय खामगांव येथें आहे.

(४) कृषि

भूगर्भशास्त्रीयदृष्टचा येथील जमीन दख्खनचा काळा दगड, वाळू, चूनखडी व 'शेल' ह्यापासून बनलेली आहे. येथील अति सुपीक अशा काळ्या जमिनीला 'भरकाळी' या नांवाने संबोधण्यांत येते.

वाळू व चूना मिश्रीत काळ्या जमिनीला 'मोरांड' असे म्हणतात. ही जमीन थोडी भूरकट असते. कापसाला भरकाळी जमीन फारच योग्य समजली जाते. चिखली व मेहकर तालुक्यांच्या पठारांवर काळी जमीन असली तरी तिचा थर पातळ आहे. हे तालुके गव्हाच्या पिकासाठी प्रसिद्ध आहेत. कापसाच्या काळ्या जमिनींत चुन्याचें प्रमाण जास्त असते. अशा जमिनीचें प्रमाण मलकापूर, जळगांव व खामगांव तालुक्यांत बरेंच आहे.

डोंगराळ जमिनीला स्थानिक लोक 'बरड' या नांवाने संबोधतात. पिकें घेण्यास ही जमीन हलकी आहे. अशा जमिनींत मुरमाचें प्रमाण जास्त असते. नांगरत असतांना जी जमीन तेल लावल्याप्रमाणें चमकते त्या जमिनीला 'चिकनी' म्हटले जाते.

या जिल्हयांतील ७९.८६ टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. एकूण पिकांखालील क्षेत्रफळ १,७०७,३२३ एकर आहे. या जिल्हयांतील एकूण जमीन पुढीलप्रमाणें व्यापलेली आहे :—

	एकर
जंगल	३०२,४३४
लागवडीस उपयुक्त नसलेली ओसाड जमीन	६३,९४८
शेतीशिवाय इतर कामासाठी उपयोगांत येत असलेली जमीन...	६७,६४४
चराईकरिता असलेली जमीन	१२३,२११
फलोत्पादनाखालील जमीन...	४,८६५
लागवडीखालील जमीन	१,७००,०००
दुहेरी पीक घेण्यांत येत असलेली जमीन	४३,४०४

जास्त पाणी धरून ठेवणाऱ्या जमिनीला 'चिबडी' असेहि संबोधिले जाते.

१९५६ साली पीकवार क्षेत्र खालीलप्रमाणें होतें :—

पिकाचें क्षेत्र	अंदाजे एकर
(१) ज्वारी	५५०,०००
(२) कापूस	६५०,०००
(३) गहूं	१००,०००
(४) भुईमूग	८०,०००
(५) मिरची	९,०००
(६) ऊंस	२,०००
वलिताखाली आलेलें क्षेत्र	२०,७८२
एकूण लागवडीखालील क्षेत्र	१,७०७,३२३

१९६०-६१ साली पीकवार क्षेत्र खालील प्रमाणें आहे :—

पिकें	एकर
कापूस	६४६,०९५
ज्वारी	५७७,११८
भुईमूग	९०,८८५
गहूं	९४,४५६
हरभरा	२०,६२४
बाजरा	१३,०८५
तूर	५६,९३०
उडीद	८१,७९७
मूग	३१,४५५
मठ	५,०९९
रब्बी ज्वार	२,६१६
जवस	३,३७२
ऊंस	२,२६९
मिरची	९,७२४
बोरू	४,३५५
संत्री	६३
भाजीपाला	३,०५५
केळीं	८८१

सध्या लागवडीखाली असलेल्या जमिनींतून अधिक उत्पादन काढून कृषि विकास साधण्यासाठी नवीन विहिरी खोदण्यांत आल्या व जुन्या विहिरीहि दुरुस्त करण्यांत आल्या. शेतकऱ्यांना १९५९-६० सालीं विहिरी खोदण्यासाठी १,७४,०७५ रुपये तकावीच्या स्वरूपांत वाटण्यांत आले. तसेच जुन्या विहिरी दुरुस्त करण्यासाठी ६६,३२५ रुपये खर्च करण्यांत आले. विहिरीवर पंप बसविण्यासाठी सुमारे ६६,३२३ रुपये १९५९-६० सालीं वाटले. तसेच शेतीसाठी सुधारलेल्या पद्धतीचा अवलंब व सुधारलेल्या बियाणांचा उपयोग, खतें, रासायनिक खतें यांचा योग्य उपयोग व पिकांवरील रोग आणि कीड यांविरुद्ध पुरेशी सावधगिरीहि शेतकरी घेत असून उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

शेतकरी संघ

शेतकऱ्यांना एकत्रीत आणून त्यांच्या शेतीविषयक अडीअडचणी सोडविण्यासाठी प्रत्येक खेड्यांत संघ स्थापण्याचे ठरविले आहे. या जिल्ह्यांत आतापर्यंत अशा तऱ्हेचे १,१४५ शेतकरी संघ स्थापन करण्यांत आले असून त्यांत १९,४९५ सदस्य आहेत. या संघामार्फत आधुनिक शेतीपद्धति व सुधारलेल्या औजारांचा प्रचार व प्रसार करण्यांत येत आहे.

सहकारी शेती संस्था

या जिल्ह्यांत एकूण ७० सहकारी शेतकी संस्था स्थापन झाल्या असून त्यांचे कार्य प्रगतिपथावर आहे. सहकारी चळवळीच्या तत्त्वांची मुळें खोल रुजत आहेत. या ७० संस्थापैकी ४ संयुक्त सहकारी शेतकी संस्था आहेत.

शेतीचें उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांना सुधारलेल्या व शुद्ध बियाणांचा पुरेसा पुरवठा होणें आवश्यक आहे असे सरकारला आढळल्यामुळें या जिल्ह्यांत अशा प्रकारची ९ तालुका बीजवृद्धि प्रक्षेत्रें उघडण्यांत आलीं. संशोधन केन्द्रानें पुरविलेल्या बीजांचा भरपूर पुरवठा करण्याच्या हेतूने या प्रक्षेत्रांवर त्यांची वाढ करण्यांत येते. हीं केन्द्रें सिंदखेड राजा, देऊळगांव मही, सेलसूर, वरवट खंडेराव, आसलगांव, पिंपळगांव राजा, शेगांव, मलकापूर व नांदुरा येथें उघडण्यांत आलीं असून त्यांचे क्षेत्र ३३१ एकर आहे. त्यांची वाढ ५०२ एकरापर्यंत करण्याचा प्रयत्न चालू आहे. या केन्द्रांवर कापूस, भुईमूग, हरभरा, बाजरी, ज्वारी, धान इत्यादि पिकांच्या बीजांचे गुणण करण्यांत येते. निरनिराळ्या पिकांखाली सुमारे ६ लाख एकराकरिता बीज पुरविण्यांत आले आहे.

बीजवृद्धि प्रक्षेत्र

आपल्या देशांतील लांब धाग्याच्या कापसाचें उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने कापसाच्या निरनिराळ्या नवीन जाती शोधून काढण्याचें काम शासनाने हाती घेतले आहे.

कापूस अभिजनन योजना इंडियन सेंट्रल कॉटन समितीच्या सहकार्याने पूर्वीच्या मध्यप्रदेश सरकारने १९५३-५४ सालीं सुरू केली. या योजनेचे नागपूर विभागांतील मुख्य संशोधन केन्द्र अकोला येथें असून बुलडाणा, यवतमाळ व नागपूर या ठिकाणीं उपकेन्द्रें आहेत. या केन्द्रांत प्रामुख्याने देशी कापसावर संशोधन करण्यांत येते व अधिक चांगल्या प्रतीच्या कापसाच्या जाती व सुधारलेल्या कापसांच्या जातीच्या लागवडीखालील क्षेत्रांत वाढ करण्यांत येते.

कापूस अभिजनन योजना उपकेन्द्र, बुलडाणा

या योजनेचा हेतू प्रामुख्याने खालीलप्रमाणें सांगता येईल :—

निरनिराळ्या भागाकरिता 'मर' रोग प्रतिबंधक 'निवड' किंवा 'संकर' करून खालील गुणयुक्त नवीन जात निर्माण करणें—(अ) वीरनार (१९७-३) या जातीच्या बरोबर किंवा जास्त उत्पन्न, (ब) ३८ ते ४० टक्के रुईचे प्रमाण, (क) ३० ते ३५ धागा नंबर निर्माण होणारी जात.

गेल्या सात वर्षांच्या आढाव्यानुसार देशी कापसाच्या रुईच्या शेकडा प्रमाणांत व धाग्याच्या लांबींत बरीच प्रगति झालेली दिसते.

शेतीची उत्पादन शक्ति वाढविण्यासाठी खतांची अत्यंत आवश्यकता असते. उत्तम बी पेरले परंतु त्या पिकाला खत मिळाले नाही तर उत्पादनांत भर पडण्याची शक्यता कमी असते. म्हणून शेतकी खात्यातर्फे विविध प्रकारचीं खतें वाटण्यांत येत आहेत. या जिल्ह्यांत साधारणतः अमोनियम सल्फेट, सुपर फॉस्फेट, युरिया इत्यादि खतें उपयोगांत आणलीं जातात. १९५९-६० सालीं या जिल्ह्यांत ३,९१० टन अमोनियम सल्फेट, ५८० टन सुपर फॉस्फेट, १२८ टन युरिया, ५५ टन नायट्रेट वाटण्यांत आलें. याशिवाय कंपोस्ट व शेणखताचाहि उपयोग बऱ्याच प्रमाणांत करण्यांत आला. तसेच शहरांत नगरपालिकांना सेंद्रीय खत तयार करण्यासाठी शेतकी विभागातर्फे मार्गदर्शन करण्यांत येते. १९५९-६० सालीं ५,६३९ टन खत तयार करण्यांत आलें. हे खत तयार करण्यासाठी नगरपालिकांना आर्थिक सहाय्यहि देण्यांत आले. गेल्या तीन वर्षांत मेहकर नगरपालिकेनें सेंद्रीय खताचें वाटप जास्त प्रमाणांत केल्यामुळें त्याहि नगरपालिकेला आर्थिक साह्य देण्यांत आलें.

खतें व रासायनिक खतें

शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति ट्रॅक्टर ठेवण्याइतपत नाही. त्यामुळें त्याला नांगरणीचें काम करण्यास कठीण जातें. ही परिस्थिति लक्षांत घेऊन शासनाने ट्रॅक्टरने शेत नांगरून मिळण्यासाठी ट्रॅक्टर केन्द्रें उघडलीं आहेत.

ट्रॅक्टर केन्द्र

या जिल्ह्यांत १९५८-५९ सालीं खामगांव तालुक्यांतील कोलोरी येथें ट्रॅक्टर नांगरणीचें केन्द्र स्थापन करण्यांत आले होते. त्याद्वारें सुमारें ३२५ शेतकऱ्यांनी तकावीच्या आधारावर आपली शेती नांगरून घेतली. १९५९-६० सालीं हे केन्द्र शेगांव येथें उघडण्यांत आले होते. त्यात

४० अश्वशक्तीचे ११ ट्रॅक्टर ठेवण्यांत आले. या केन्द्राचा फायदा सुमारे १८ खेड्यांतील शेतकऱ्यांनी घेतला.

सुधारलेल्या पद्धतीची प्रत्यक्ष माहिती देतां यावी या दृष्टीनें प्रत्येक ग्रामसेवक मंडळांत प्रात्यक्षिक केन्द्र उघडण्यांत आले. कृषि विभागातर्फे त्यांत निरनिराळी प्रात्यक्षिकें करून दाखविण्यांत येतात.

कृषि प्रात्यक्षिक केन्द्रें

जिल्ह्यांत साधारणतः एका वर्षांत १५० प्रात्यक्षिकें करून दाखविण्यांत येतात. तसेच दरवर्षी जिल्हा विकास मंडळातर्फे एक जिल्हा कृषि प्रदर्शन आयोजित करण्यांत येते. प्रदर्शनांत जिल्ह्यांतील निरनिराळ्या जातींचे पशू, कोंबड्या, उत्तम प्रकारची बी-बियाणें, हस्तकला व ग्रामोद्योगांत तयार होणाऱ्या वस्तू, वगैरेहि ठेवण्यांत येतात.

राज्य पातळीवर होणाऱ्या पीक स्पर्धेतहि या जिल्ह्यांतून बरेच शेतकरी भाग घेतात.

बागायत

या जिल्ह्यांतील नळगंगा नदी प्रकल्पाचे काम चालू असून १९६२ च्या जूनपर्यंत ते पूर्ण होईल असा अंदाज आहे. या धरणामुळें जिल्ह्यांतील आणखी २५ हजार एकर जमीन वलीताखाली येईल.

सिंचनासाठी उपयोगांत येणाऱ्या विहिरींची संख्या १३,०६३ आहे. पाणी पिण्यासाठी १५,६०५ विहिरी आहेत. सिंचनासाठी या जिल्ह्यांत सध्यां ९८७ पंपांचा उपयोग करण्यांत येत आहे.

उद्यान विकास

महत्त्वाच्या बागायती व भाजीपाला वगैरे पिकासंबंधी संशोधन करण्यासाठी व फळांचे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीनें सरकारने एक योजना आंखली असून त्यासाठी एक कृषि पर्यवेक्षक व एक माळी यांच्या नेमणुका करण्यांत आल्या. शेतकऱ्यांशी चर्चा करून त्यांना मार्गदर्शन करण्याचें काम हे करतात. मार्च १९६१ पर्यंत साधारणतः २८५ एकर जमीन फळाच्या व भाजीपाल्याच्या लागवडीखाली होती.

पीक संरक्षण

पिकांचे रोगापासून व कीटकापासून संरक्षण करण्यासाठी जवळजवळ सर्वच ग्रामपंचायतींना किटकनाशक फवारण्याचे यंत्र व साहित्य देण्यांत आले आहे. त्यांना योग्य वेळी किटकनाशक औषधी मिळण्याच्या हेतूनें विकास खंड कार्यालयांत किटकनाशकांचे सांठे ठेवण्यांत आले.

भूसंरक्षण कार्य

जमिनीची धूप थांबविण्यासाठी, ओलावा कायम ठेंवण्यासाठी व जमिनीची उत्पादन शक्ति वाढविण्याच्या दृष्टीने शेतांत समपातळी बांध घालण्याच्या योजनेला या जिल्ह्यांत १ ऑगस्ट १९५८ पासून सुरवात झाली. खामगांव, मलकापूर व चिखली तालुक्यांत २० केन्द्रें स्थापन करून बांध घालण्याचें कार्य चालू आहे. १९६० पर्यंत १६,९७७ एकर जमिनीला बांध घालण्यात आले. या योजनेवर जिल्ह्यांत सुमारे १,६१,००० रुपये खर्ची पडले.

शेतीला उपयोगी असणारीं अवजारें

या जिल्ह्यांत आधुनिक कृषि औजाराबरोबरच परंपरेने चालत आलेल्या अवजारांचाहि उपयोग करण्यांत येतो. मलकापूर, खामगांव आणि जळगांव तालुक्यांत पहिल्या नांगरणीसाठीं लोखंडी ४ किंवा ६ बैली नांगराबरोबरच २ बैली लांकडी नांगराचाहि उपयोग करण्यांत येतो. नांगरणीचें काम साधारणतः शेतामध्यें २ वर्षानें करण्यांत येते. लांकडी नांगरांचे दोन भाग आहेत. हलक्या नांगराकरितां २ बैल उपयोगांत आणून साधारणतः ६ इंच खोलीपर्यंत नांगरणी होते. जड नांगरणीकरितां २-३ बैलजोड्या उपयोगांत आणतात. हा नांगर बाभळीच्या लांकडापासून तयार करतात व नांगराची दांडी ही तिवसाची किंवा बाभळीची असते.

वखर पूर्वमशागतीसाठी उपयोगांत आणतात. वखर हा साधारणतः बाभळीच्या लांकडाचा ३० इंच लांब, ९-१० इंच रुंद व ६ इंच जाडीचा असतो. वखराला २१ इंच लांबीची लोखंडी पास असते व तिची रुंदी ४ इंच असते. याची दांडी बहुधा सागाची किंवा तिवसाची असते. हा एका बैलजोडीने ओढला जातो.

मोठे 'खोड' असलेल्या वखराला 'मोंगडा' म्हणतात. त्याला ४ बैल जुंपतात. वखर किंवा मोंगडाचा उपयोग नांगरीनंतर ढेकळे फोडण्याकरिताहि करतात.

अंतरमशागतीच्यावेळी 'डवरा' व 'दुंडा' यांचा उपयोग करतात. एका बैलजोडीवर दोन 'डवरे किंवा 'दुंडे' यांचा उपयोग करतात. दुंडचांचा उपयोग साधारणतः दोन तासामध्यें जास्त अंतर असलेल्या पिकांसांठी करण्यांत येतो उदाहरणार्थ—कापूस. दुंडे व डवऱ्यांचा आकार वखरासमानच असतो परंतु खोडांची लांबी-रुंदी कमी असते. डवऱ्याचा उपयोग ज्वारीच्या पिकामध्यें करण्यांत येतो. पेरणी-करितां तीन दाते असलेल्या वखराप्रमाणें असलेल्या औजाराचा उपयोग करण्यांत येतो. त्याला 'तिफण' म्हणतात. तिफणीची लांबी ३-४ फूट असते व बीज टाकण्याकरितां 'सरते' किंवा 'नळचा' दात्यांशी जोडलेल्या असतात. बीज टाकण्याकरितां चाळचाचा उपयोग करतात.

शेताला पाणी देण्याकरितां इलेक्ट्रिक व ऑईल पंपाबरोबरच मोट व रहाट यांचाहि उपयोग करण्यांत येतो. ३० फूट खोलीच्या विहिरींतून १ मोट दरतासी साधारण १,५०० गॅलन पाणी उपसते.

निंदण, कापणी वगैरेसारखी कामें विळ्याच्या सहाय्याने करण्यांत येतात, त्यास कित्येक ठिकाणीं खुरपे म्हणतात.

(९) पाटबंधारे

पैनगंगा, जळगंगा, नळगंगा, विश्वगंगा, ज्ञानगंगा, पूर्णा, खडकपूर्णा, काटेपूर्णा इत्यादि लहान-मोठ्या नद्या या जिल्ह्यांतून वाहत असल्या तरी उन्हाळचांत त्यांना मुळीच पाणी नसते. यामुळें त्यांचा उपयोग पिकाच्या वलिताकडे फारच कमी प्रमाणांत करण्यांत येतो.

या नद्यांचा उपयोग शेतीकडे व्हावा म्हणून कांही योजना आंखण्यांत आल्या. नागपूर विभागांतील शेती विकासासाठी ज्या प्रमुख सिंचन योजना आंखण्यांत आल्या त्यापैकी नळगंगा नदी प्रकल्प ही एक योजना होय. या प्रकल्पामुळें केवळ शेतकी उत्पादनच वाढणार नसून औद्योगिक कार्याचाहि विकास होईल.

नळगंगा नदी प्रकल्प

पूर्वीच्या मध्यप्रदेश सरकारने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत पाणीपुरवठ्याचे साधन म्हणून ही योजना हाती घेऊन १२३ लाख रुपये खच करण्याचें ठरविलें होते. परंतु राज्याच्या पुनर्रचनें-मुळें त्यावेळच्या मुंबई सरकारनें या योजनेची पुनतपासणी करून २०१ लाख रुपयाची ही योजना मंजूर केली.

योजनेची पार्श्वभूमि

नळगंगा नदी बुलडाण्याच्या घाटांत उगम पावते. मलकापूरपासून १३ मैलावरील सांगळद खुर्द व सांगळद बुद्रुक येथें जळगंगेशीं तिचा संगम होतो. संगमाच्या खालच्या जागेवर धरण बांधण्यांत येत आहे.

योजनेची जागा

या धरणामध्यें संपूर्ण मातीच्या बंधाऱ्याचा समावेश असून त्याची लांबी ७,७७० फूट म्हणजे जवळजवळ दीड मैल व नदीच्या पात्रापासून कमाल उंची ९६ फूट राहील. या संकल्पीत प्रकल्पांत सुमारे १२२ चौरस मैलांचें पाणलोटाचें क्षेत्र असून त्यांत २,५२६ दशलक्ष घनफूट पाणी सांठविलें जाईल.

७,७७० फूट लांबीचें धरण

नळगंगा धरणाच्या उजव्या बाजूस १९ मैल लांबीचा कालवा काढण्यांत येईल. या कालव्याचा फायदा ३० खेड्यांतील लोकांना मिळूं शकेल. कालव्याद्वारे दरवर्षी अंदाजे २४,५०० एकर जमिनींतील कपाशी, ज्वारी, तांदुळ व गहूं या पिकांना पाणी देतां येईल व जवळजवळ ५०९ एकर जमिनीवर केळीसारखी बागायती पिकें घेतां येतील. या धरणास ११ लोखंडी दरवाजे राहतील, प्रत्येक दार ४०′ × १४′ एवढे राहील.

२४,५०० एकर जमिनीला पाणी-पुरवठा

बंधाऱ्याचें व कालव्याचें काम लोककर्म विभागातर्फे करण्यांत येत आहे. बरेच काम स्केपर्स व डोझर ट्रॅक्टर्सने करण्यांत येत आहे. हे काम चार उप-विभागांत विभागले आहे व जवळजवळ १०० कर्मचारीवर्ग दोन व प्रसंगी तीन पाळीनेहि खपत आहेत. बंधाऱ्याचे काम निम्म्यापेक्षां जास्त संपले आहे. या बंधाऱ्याचें काम जून १९६२ पर्यंत पूर्ण होईल अशी आशा आहे. ही योजना पूर्ण झाल्यावर सुमारे ४,९०० टन अधिक अन्नोत्पादन वाढेल असे तज्ञांचे मत आहे.

वसाहत

१७५ कुटुंबाना राहतां येईल अशा तऱ्हेची वसाहत नळगंगापूर येथें बांधण्यांत आली. मलकापूरपासून ६-७ मैलावरील उमाळी येथे २० कुटुंबासाठी वसाहत बांधली आहे.

शेतीचें उत्पन्न



विड्याचीं पानें
बीज गुणण केंद्र
कापूस संशोधन केंद्र व
शासकीय कृषि प्रक्षेत्र
जळगांव
कापूस व ज्वारी
आसलगांव
भूईमूग
मलकापूर
नांदूरा
कापूस व ज्वारी
शेगांव
खामगांव
गहूं
पिंपळगांव राजा
संत्री
पेरू
बुलढाणा
मासरुळ
ज्वारी
धाड
तीळ जवस
गळिताचीं धान्यें
गहूं व ऊंस
ऊंस
कापूस व ज्वारी
गहूं
सिंदखेड राजा
गहूं

३ गांवें पाण्याखाली बुडतील

या धरणामुळें जवळ जवळ २,७०० एकर जमीन व एकंदर १,००० लोकवस्तीची मलकापूर तालुक्यांतील सांगळद खुर्द, सांगळद बुद्रुक व चिंचपूर ही तीन खेडीं पाण्याखाली बुडतील. त्यांच्या पुनर्वसनासाठी सरकारतर्फे जवळ जवळ १८ लाख रुपये खर्च करण्यांत येतील.

गेरूमाटरगांव मध्यम सिंचन योजना

तृतीय पंचवार्षिक योजनेंत या योजनेचा समावेश करण्यांत येणार आहे त्या दृष्टीने या भागाची प्राथमिक पाहणीसुद्धां झालेली आहे. या योजनेवर अंदाजे ९० लाख रुपये खर्च होतील आणि त्यामुळें १४,००० एकर जमिनीला पाणी पुरवठा करण्यांत येईल असा अंदाज आहे.

लघुसिंचन योजना

६१ लघुसिंचन योजनांची पाहणी झालेली असून त्यांवर अंदाजे २११ लाख रुपये खर्च होतील.

याशिवाय गायखेडी तलावाचें, गांगलगांव येथें बंधारा, रहोडा तपोवन येथे ॲनिकट, आंबोसी बंधारा, खैरो बंधारा, इत्यादि कामें पूर्ण झाली असून त्यावर मार्च १९६० अखेर १६,७०० रुपये खर्च झाले. ही योजना पूर्णपणें कार्यान्वित झाल्यावर या योजनेमार्फत १५,५७६ एकर जमिनीला वलितासाठी पाणी पुरवठा करण्यांत येईल.

(६) पशुसंवर्धन

आपल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेंत पशुसंवर्धनास फार महत्वाचे स्थान आहे. त्यामुळें पशुसंवर्धनाकडे विशेष लक्ष दिले जात आहे. गुरांच्या औषधोपचाराच्या सोई व पशु-वैद्यकीय शिक्षण आणि गुरांची सुधारणा यांच्याकडे प्रामुख्याने लक्ष देण्यांत आले आणि त्याप्रमाणें कार्यक्रमहि आंखण्यांत आला. पशुसंपत्तीचा ऱ्हास करणाऱ्या भयानक रोगांच्या निर्मूलनाकडेहि विशेष लक्ष पुरविण्यांत आलें.

या जिल्ह्यांत गुरांची संख्या १,२००,६७० आहे. पशुधनांत बैल, गाई, म्हशी, रेडे, बकऱ्या, घोडे, मेंढ्या, कोंबड्या आदींचा समावेश होतो. त्यांत ४९७,९२८ बैल, गाई, वासरें इत्यादि आहेत.

पूर्वी या जिल्ह्यांत खामगांव ब्रीड नांवाच्या नांवाजलेल्या बैलांची जात होती. परंतु ती आता नाहीशी होऊन त्याची जागा नेमाडी जातीने घेतलेली आहे. याशिवाय नागपूर व 'माळवा' जातीचे बैल कांही ठिकाणीं दिसून येतात. क्वचित ठिकाणीं गौळाऊ जातहि आहे.

औषधोपचाराच्या सोयी

गुरांच्या निरनिराळ्या सांसर्गिक रोगांना त्वरित व परिणामकारक प्रतिकार करता यावा व आजारी गुरांना शास्त्रशुद्ध मदत मिळावी म्हणून पशुवैद्यक विभागाचे कार्य या जिल्ह्यांत चालू आहे. बुलडाणा येथें जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांची मुख्य कचेरी असून यांच्यामार्फत औषधोपचाराचे कार्य होत असतें.

पहिल्या पंचवार्षिक योजनेपूर्वी बुलडाणा जिल्ह्यांत सर्व साधनांनी सज्ज असे गुरांचे ८ व बाह्यवर्ती १४ दवाखाने होते. आता ही संख्या अनुक्रमें ११ व २२ झाली आहे.

पशुसंवर्धनाकडे लक्ष देण्यासाठी या जिल्ह्यांत सध्या १० पशुसंवर्धन अधिकारी, ३० स्टॉकमन व ३० कंपाऊंडर काम करीत आहेत. म्हणजेच एकूण ७० कर्मचारी या कार्यांत दक्ष आहेत.

मलकापूर येथें एका सुसज्ज दवाखान्याचें काम चालू आहे. या शिवाय पिंपळगांव राजा व मेरा बुद्रुक येथेहि दवाखाने बांधण्यास मंजूरी मिळालेली आहे.

प्रमुख ग्राम केन्द्र

निवडक विभागांत जोमाने कार्य करण्याच्या उद्देशाने प्रमुख ग्राम केंद्र योजना सुरू करण्यांत आली. यामध्यें निकामी वळू खच्ची करणें, कृत्रिम गर्भधारणा केन्द्राच्या मार्गदर्शनाखाली गुरांची पैदास करणें, वासरांची पैदास करण्यास आर्थिक मदत देणें, गुरांचें खाद्य मिळविण्याच्या साधनांचा विकास आणि सहकारी तत्त्वावर पशुसंवर्धन, मालाची विक्री, इत्यादींचा समावेश होतो. अशा प्रकारची ४ किंवा ५ प्रमुख गांवें मिळून एक प्रमुख "गांवकेन्द्र" बनते. बुलडाणा जिल्ह्यामध्यें पहिली पंचवार्षिक योजना सुरू होण्यापूर्वी दोन प्रमुख गांवकेन्द्रें होती. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्यें यांत ७ केन्द्रांची भर घालण्यांत आली. या खेरीज बुलडाणा जिल्ह्यामध्यें ६ नियंत्रित पैदास केन्द्रहि आहेत. पाडळी, रायपूर, पांगरखेड, डोंगरखंडाळा या खेड्यांत अशी केन्द्रें उघडण्यांत आली आहेत. या ठिकाणीं नेमाडी जातीचें १६ सांड ठेवण्यांत आले आहेत.

कृत्रिम गर्भ-धारणा केंद्र

पशुधनाची सुधारणा करण्याच्या दृष्टीने गुरांची विशेषतः दुभत्या गुरांची कृत्रिमरीत्या गर्भधारणा करून पैदास करण्याची पद्धत फायद्याची आहे. १५ जुलै १९५५ रोजीं बुलडाणा येथें अशा प्रकारचें केन्द्र प्रथम उघडण्यांत आलें व कृत्रिमरीत्या गर्भधारणेचे काम होऊं लागलें. या योजनेचा विस्तार होत होत आज बुलडाण्याशिवाय राजूर, देऊळघाट हतेडीं, नाद्राकोळीं, भादोला व येलगांव या ठिकाणींहि अशी केन्द्रें उघडण्यांत आलींत.

या जिल्ह्यांत आतापर्यंत या योजनांतर्गत ४३७ वासरांच्या जन्माची नोंद करण्यांत आलेली आहे.

शेतीच्या धंद्यावर शेतकऱ्याला बाराहि महिने भरपूर कामधंदा पुरत नसल्यामुळें त्याला जोड धंद्याची आवश्यकता भासते. आपल्या उत्पन्नांत भर घालून आर्थिक स्थैर्यता त्यामुळें प्राप्त करून घेतां येते.

कुक्कुट पालन

या योजनांतर्गत मेहकर, शेगांव, नांदुरा, व जळगांव (जामोद) या ठिकाणीं कुक्कुट पालन प्रात्यक्षिक केन्द्रें उघडण्यांत आली आहेत. या शिवाय खामगांव येथें एक मोठें कुक्कुट पालन प्रक्षेत्र शास--नाच्या विचाराधीन आहे.

कोंबडया घेण्याकरिता शेतकऱ्यांना १५,००० रुपये वाटण्यांत आले आहेत.

गोशाळेच्या विकासाची योजना

गोशाळेचा दर्जा सुधारण्यासाठी व त्याची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी खामगांव येथील गोरक्षण संस्थेंत १० 'गीर' गाई व १ 'गीर' सांड पुरविण्यांत आले आहे. तसेच या संस्थेला आर्थिक साह्य देण्यांत आले आहे. देशी मेंढयांच्या कळपापासून मिळणाऱ्या लोकरीच्या प्रमाणांत व दर्जांत सुधारणा करण्याच्या दृष्टीने नांदुरा व खामगांव विकास खंडांत कार्य सुरू झालेलें आहे.

गुरांसाठी प्रथमोपचाराच्या पेटचा

ज्या ठिकाणीं पशु-दवाखान्याची सोय नाही तेथील शेतकऱ्यांना तात्कालिक सोय मिळावी म्हणून एक योजना आंखण्यांत आली आहे. या योजनांतर्गत ५ मैलाच्या परिसरांतील ४ खेडयांचा एक असे गट स्थापन करण्यांत आले व त्या गटांना गुरांच्या प्रथमोपचाराची एक पेटी देण्यांत आली. या पेटीमध्यें निरनिराळी ४० औषधें असून तिची किंमत १२५ रुपये आहे. ह्या पेटचा ग्रामपंचायतीनें पशुसंवर्धन अधिकाऱ्यांकडून विकत घेतल्या आहेत. आतापर्यंत १५ पेटचा ठेवण्यांत आल्यात. स्टॉकमन किंवा कंपाऊंडर यांच्या सल्ल्यानें गुरांना औषध देण्यांत येते.

(७) सहकार्य

सहकारी चळवळीला चालना देण्यास शेतकरी लोकांची आर्थिक दुरावस्था मुख्यत: कारणीभुत झाली. शेतकऱ्यांना पैशाची फारच अडचण भासे त्यामुळें त्यांना सावकारांकडे जावे लागे. त्यांचे दामदुपटीचें भरमसाट व्याज, खोटे हिशेब, वगैरेमुळें थोडचा पैशाकरिता जमीन गमावण्याची पाळी अनेक शेतकऱ्यांवर आली. ही परिस्थिति दूर करण्यासाठी सहकारी चळवळीचें फार सहाय्य झालें.

मध्यर्वाति पेढचा

सहकारी चळवळींत मेहकर तालुक्यांतील कांहीं गृहस्थांनी फारच महत्त्वाची कामगिरी केलेली आहे. शेतकऱ्यांना योग्य कर्ज योग्य वेळी व योग्य व्याजाच्या दरानें मिळावें म्हणून मध्यर्वति पेढीची स्थापना झाली. या जिल्हयांत ४ मध्यर्वति पेढचा आहेत. त्यापैकी बुलडाणा शहरांतील पेढी या जिल्हयांत सर्वांत जुनी पेढी समजली जाते. ह्या पेढचांमार्फत शेतकऱ्यांच्या कर्जासंबंधीच्या गरजा पुरविल्या जातात. त्यांना मध्यम मुदतीचें तसेच लघु मुदतीचें कर्ज मिळू शकते. १९५९-६० सालीं या पेढीमार्फत ११२.२९ लाख रुपये वाटण्यांत आलें व लघु मुदतीचे कर्ज म्हणून ३९ लाख रुपये देण्यांत आले. मलकापूर येथील पेढीने खतासाठी ३० हजार रुपये दिलें.

जमीन तारण पेढी

या जिल्हयांत खामगांव व मेहकर या ठिकाणीं जमीन तारण पेढी तसेच बुलडाणा, व मलकापूर येथें मध्यर्वति सहकारी पेढीबरोबरच ही पेढीहि काम करते. या पेढीने १९५९-६० पर्यंत ७.५४ लाख रुपये वाटलें.

प्राथमिक पतपेढचा

बुलडाणा जिल्हयांत सध्या ५६६ सेवा सहकारी संस्था आहेत व पतपेढचांची संख्या ८६ आहे. ह्या ८६ पतपेढचांचें सेवा सहकारी संस्थेंत रूपांतर करण्यासाठी प्रयत्न करण्यांत येत आहेत. २२५ सेवा सहकारी संस्थांना १९५९-६० वर्षी प्रत्येकी ५०० रुपये व्यवस्थापकीय आर्थिक साह्य मिळाले.

बहुद्देशीय सहकारी संस्था

मोठचा स्वरूपाच्या बहुद्देशीय सहकारी संस्था स्थापन करण्याचे प्रयत्न चालू असून या जिल्हयांत एकूण ३९ मोठचा स्वरूपाच्या विविध कार्यकारी सहकारी संस्था आहेत. त्यापैकी ३२ संस्थांना प्रत्येकी ७,५०० रुपये भाग भांडवल (शेअर कॅपिटल) मिळाले असून २८ संस्थांना व्यवस्थापनासाठी प्रत्येकी ६०० रुपये आर्थिक सहाय्यहि मिळाले आहे. १८ संस्थांना शासनाकडून लहान आकाराच्या गोदामांसाठी १.०५ लाख रुपये मिळाले आहेत.

या जिल्हयांत ९ गोदामें बांधण्यांत आलीं. त्यापैकी ७ गोदामांसाठी शासनाकडन आर्थिक सहाय्य मिळाले. अमडापूर आणि चांदूरबिस्वा येथील गोदामें विकास गटांच्या पैशांतून बांधलीं आहेत. पिंपळगांव राजा येथें एका गोदामाचे काम चालू आहे. शुद्ध बी-बियाणें, खतें, शेतीची औजारें आणि घरगुती उपयोगाच्या वस्तू पुरविणें यासारख्या रोखीच्या व्यवहाराची कामें देखील हाती घेण्यांत आली आहेत. हंगामाच्या सुरवातीला शेतकी मालाची कमी भावाने विक्री होणें बंद झालें आहे. केळवद सहकारी संस्थेचा एक चांगली सहकारी संस्था म्हणून उल्लेख करण्यांत येतो. येथें जिनींग फॅक्टरी सुरू झाली असून कापसाचा संग्रह करण्यांत येतो. खेर्डा येथील सहकारी संस्थाहि उच्च श्रेणीची समजण्यांत येते.

सहकारी खरेदी विक्री संघ

कर्ज पुरवठा, उत्पादन व माल विक्री यांचा योजनाबद्ध मेळ घातला गेला तर शेतीचे व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यास मदत होईल, हे कोणीहि मान्य करील. त्यासाठी सहकारी खरेदी विक्री संघाचें विशेष महत्त्व आहे. सहकारी खरेदी-विक्री ही शेतकऱ्याच्या सहकाराच्या दृष्टीनेहि अत्यंत आवश्यक व महत्त्वाची बाब आहे. नियंत्रित बाजारपेठांचा विकास करणें, वखारींच्या सोयींची तरतूद करणें हीं शेतकी अर्थव्यवस्थेंत सुधारणा करण्याबाबतच्या एकसूत्री कार्यक्रमाची महत्त्वाची अंगें आहेत.

मलकापूर येथें असलेली धान्याची बाजारपेठ ही नियंत्रित बाजारपेठ म्हणून जाहीर करण्यांत आली आहे. चिखली, मलकापूर, मेहकर, देऊळगांव राजा, खामगांव, शेगांव व जळगांव अशा सात ठिकाणीं सहकारी खरेदी-विक्री संघ आहेत. या संघांना मोठ्या स्वरूपाच्या वखारी बांधण्यासाठी शासनातर्फे ९३,५९० रुपये भाग भांडवल व कर्ज म्हणून १२,००० रुपये मंजूर करण्यांत आले आहेत.

शेतमालावरील प्रक्रिया संस्था

आपल्या शेतमालाचा पुरा लाभ घेण्यासाठी माल प्रक्रियेचा अवलंब करणें शेतकऱ्यांना आवश्यक आहे. कच्चा कापूस विकण्यापेक्षा त्याची पिलई करून विकणें व त्याहिपेक्षा गाठी बांधून विकणें हे कितीतरी फायदेशीर आहे. खाजगी पातळीवर अशा प्रक्रिया करण्याच्या अनेक गिरण्या आहेत. माल कमी भावांत घ्यावा, त्याच्यावर प्रक्रिया करून घ्यावी व जास्त भावांत तो विकून सर्व नफा आपणच घ्यावा या दृष्टीने गिरणी मालक वा व्यापारी विचार करतात, म्हणून उत्पादक शेतकऱ्यांचीच सहकारी गिरणी बनेल तर प्रत्यक्ष शेतकऱ्यांना जास्त लाभ होईल, आणि उत्पादन व वितरण यामध्यें चांगली सहकारी साखळीहि तयार होऊं शकेल. या जिल्ह्यांत स्वतंत्र अशा ४ संस्था आहेत. केळवद येथील मोठ्या स्वरूपाच्या विविध कार्यकारी संस्थेने जिनींग फॅक्टरी बांधली आहे व इतर तीन संस्थांचें काम जिनींग फॅक्टरी काढण्या-संबंधी प्रगतीपथावर आहे. या ४ संस्था मेहकर, चिखली, संग्रामपूर आणि मलकापूर येथें आहेत. त्यासाठी ८०,००० रुपये मंजूर झाले आहेत.

शिनगांव जहागीर येथील मोठ्या स्वरूपाच्या विविध कार्यकारी सहकारी संस्थेने गूळ तयार करण्याची फॅक्टरी काढली आहे.

सहकारी शेतकी संस्था

८० टक्के शेतकरी असे आहेत की, त्यांची स्वतःची जमीन फारच थोडी आहे आणि खर्चाच्या दृष्टीने लागवडीस न परवडणारी आहे. शिवाय त्यांना आधुनिक साधनांचाहि उपयोग करतां येत नाही. त्यांच्या फायद्याच्या दृष्टीने सहकारी शेतीचे उपाय सुचविले गेले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी या जिल्ह्यांत एकूण ४ संस्था स्थापन करावयाच्या होत्या, परंतु १९५९-६० पर्यंत एकूण १३ सहकारी शेतकी संस्था सुरू झाल्या आहेत. त्या संस्थांपैकी ३ संयुक्त सहकारी शेती संस्था आहेत. चालढाणा आणि शांतीनगर येथील सहकारी संस्था सर्वोदय योजनेखाली असून आदीवासींना त्यांचा फायदा मिळत आहे.

सहकारी पाणी-पुरवठा संस्था

निसर्गावर अवलंबून असलेल्या शेतीचा धोका लक्षांत घेतां शेतमालाचें उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने शेतीस पाणी-पुरवठा करणाऱ्या योजनेस अत्यंत महत्त्व आहे. ज्या शेतकऱ्यांना नैसर्गिक अडचणी-मुळें व इतर कांही कारणामुळें पाटबंधारे, कालवे व पाण्याची तळीं यांचा उपयोग करून घेतां येत नाही अशा शेतकऱ्यांसाठी नदी-नाले आणि विहीरी यांपासून पंपाच्या साहयाने शेतीस पाणीपुरवठा करण्याची योजना फायदेशीर ठरते. अशा प्रकारची योजना कठोरा व राहेरी येथें आंखण्यांत आली. या संस्थेमुळें सुमारे ४५० एकर जमीन वलीताखाली आणली जाईल. आणखी पांच ठिकाणीं अशी योजना सुरू करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

गृह-निर्माण संस्था

शहरांतील लोकांसाठी व कमी उत्पन्नाच्या लोकांसाठी एकूण १४ गृह-निर्माण संस्था या जिल्ह्यांत आहेत. मागासलेल्या जातीच्या लोकांची अशी एक संस्था मलकापूरला असून त्या संस्थेचें ३५ सभासद आहेत.

दूध-पुरवठा संस्था

शेतकऱ्यांना किफायतशीर जोडधंदा मिळावा म्हणून दुग्धव्यवसायावर भर देण्यांत येत आहे. आतापर्यंत बुलडाणा येथें एक दुग्ध-पुरवठा सहकारी संस्था होती. आता "दुग्ध-पुरवठा संघ" खामगांव येथें काढण्याचे ठरले आहे.

धान्य सांठा संस्था

धान्य साठा संस्था शेतकऱ्यांना धान्याच्या स्वरूपांत कर्ज देतात. अशा ७ संस्था या जिल्ह्यांत आहेत. तसेच २७ नागरी कर्जाऊ संस्था आहेत. त्यांतून शहरांतील पगारी नोकर व शाळामास्तर यांना रक्कम कर्जाऊ दिली जाते.

सहकारी ग्राहक संस्था

वाढत्या व लहरी बाजारभावांना आळा घालून गिऱ्हाईकांना योग्य दरांत माल पुरविण्याचे व्यवहार सेवाभावाने करणारी यंत्रणा म्हणजेच सहकारी ग्राहक संस्था होय. या जिल्ह्यांत अशा एकूण २१ संस्था आहेत. याशिवाय ४६ औद्योगिक सहकारी संस्था असून ७ इतर संस्था आहेत.

पीक संरक्षण संस्था

पिकांचे संरक्षण करण्यासाठी निरनिराळ्या पीक संरक्षण समित्या व संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत. अशा संस्था खड्याखेड्यांत विखुरल्या आहेत.

(८) सामूहिक विकास

राष्ट्र उभारणीच्या कार्याचा विस्तार करून आणि अर्थव्यवस्थेचा विकास साधून कल्याणकारी राज्याच्या दिशेने लोकांची प्रगति व्हावी या उद्देशानें ९ वर्षांपूर्वी म्हणजे २ ऑक्टोबर १९५२ रोजीं विकास योजनेच्या कार्यास सुरवात झाली. आपला देश खेडचांत वसलेला आहे. देशाची प्रगति म्हणजे ग्रामीण भागाची प्रगति असाच त्याचा अर्थ होतो.

भारतीय खेडचानें देशाला ध्येय, अर्थ आणि श्रद्धा दिली आहे, असे भारताचें उपाध्यक्ष डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचे मत आहे. भारतीय खडें हे देशाच्या सामाजिक व आर्थिक व्यवस्थेचें सजीव आणि संचेतन असे प्रतीक मानण्यांत येते. जनजागृति व जनसहकार्याशिवाय ग्रामीण विकास साध्य होणें अशक्य वाटल्यावरून ग्रामीण जनतेंत असलेल्या सुप्त शक्तीला वाव देऊन त्यांच्यांत असलेल्या वाईट प्रवृत्तीचे निर्मूलन करण्यासाठी व मानवी शक्ति आणि भौतिक साधन सामुग्रीच्या उपयोगाबरोबरच ग्रामीण जनतेची जीवनदृष्टि बदलून विकासाची प्रेरणा त्यांच्यांत निर्माण करण्यासाठी जिल्हा पातळीवर जिल्हा विकास मंडळ आणि गट पातळीवर गट विकास समित्या यांची स्थापना करण्यांत आली.

येथील जिल्हा विकास मंडळांत एकूण ७९ सदस्य असून त्यांपैकी सरकारी २३, गैरसरकारी ११ आणि इतर ४५ सदस्य आहेत. मुख्य कचेरी बुलडाणा येथें असून जिल्हाध्यक्ष मंडळाचा अध्यक्ष आहे.

शेतकऱ्यांना शास्त्रीय शेती पद्धतीसंबंधी मार्गदर्शन करून शिक्षण देणें, ग्रामोद्योग पूरक धंद्यांची माहिती देणें ; ग्रामीण जीवन विकासाचें जे नवे नवे प्रयोग रोज होत आहेत त्याचे लोण खेडे विभागांत पोहचविणें ; आपल्या भागांतील शेतकऱ्यांचे प्रश्न, अडीअडचणी यांची माहिती निरनिराळ्या संशोधन केन्द्रांना व संस्थांना पुरवून त्यावर उपाय शोधून काढणें इत्यादि उद्दिष्टें लक्षांत ठेवून या जिल्हचांत २ ऑक्टोबर १९५३ रोजीं बुलडाणा, शेगांव व नांदुरा येथें विस्तार योजना लागू करण्यांत आली. आज जिल्हचांतील सर्व भाग विकास योजनांनी व्यापलेला आहे. एकूण १३ विकास गट असून त्यापैकी ४ पूर्व विस्तार गट, ४ प्रथमावस्था गट, २ सामूहिक विकास गट आणि ३ द्वितीयावस्था विकास गट आहेत. जिल्हचांतील विकास गटांची माहिती पुढीलप्रमाणें आहे :—

क्रमांक	गटाचें नांव	सुरू केल्याची तारीख	क्षेत्र चौरस मैल	अवस्था
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	बुलडाणा	२-१०-१९५३	३०४.०८	द्वितीयावस्था.
२	नांदुरा	२-१०-१९५३	१८०.००	द्वितीयावस्था.
३	शेगांव	२-१०-१९५३	२९६.४४	द्वितीयावस्था.
४	जळगांव	२-१०-१९५४	१८७.३७	सामूहिक.
५	मेहकर	२-१०-१९५४	३७४.०३	सामूहिक.
६	खामगांव	१-४-१९५७	४१३.१८	प्रथमावस्था.
७	संग्रामपूर	१-४-१९५७	२८६.६०३	प्रथमावस्था.
८	मोताळा	१-४-१९५८	२४४.०६	प्रथमावस्था.
९	लोणार	१-४-१९५९	२७५.५९	प्रथमावस्था.
१०	किनगांव राजा	१-१०-१९५९	३२८.००	पूर्वविस्तार.
११	चिखली	१-४-१९६०	०८.००	पूर्वविस्तार.
१२	देऊळगांव राजा ...	१-४-१९६०	३१२.००	पूर्वविस्तार.
१३	मलकापूर	२-१०-१९६०	२२७.००	पूर्वविस्तार.

(९) स्थानिक स्वराज्य संस्था

"स्वातंत्र्याची सुरुवात मूळापासून झाली पाहिजे. अशा रीतीने प्रत्येक गांव हे प्रजासत्ताक बनेल. तेथील पंचायतीला संपूर्ण अधिकार राहतील". स्वतंत्र भारताचे हे चित्र पू. गांधीजींनी आपल्या देशापुढे ठेवले होते. महात्माजींचे हे ग्रामस्वराज्याचे स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न सर्वतोपरीने करण्यांत येत आहे.

ग्रामपंचायती

ग्रामपंचायत ह्या ग्रामस्वराज्याच्या मूलभूत संस्थेमार्फतच गांवांचा सर्वांगीण विकास घडवून आणतां येईल. ग्रामपंचायत म्हणजे समाजधारणेसंबंधीची भारताची वैशिष्ट्यपूर्ण विचारधारा आहे. हे महत्त्व लक्षांत घेऊन भारतांत ग्रामपंचायतींची उभारणी झाली. या जिल्ह्यांत आतापर्यंत ७२७ ग्रामपंचायती स्थापन झाल्या आहेत. ५०० ते १,००० किंवा जास्त लोकसंख्या असलेल्या गांवीं स्वतंत्र ग्रामपंचायती व कमी लोकसंख्या असलेल्या गांवीं गट ग्रामपंचायती स्थापन करण्यांत आल्या आहेत. जिल्ह्यांत ६७ न्यायपंचायतीहि आहेत.

जनपद सभा

प्रत्येक तालुक्यांत जनपद सभा आहे. या संस्थेच्या कारभारांत मदत करण्यासाठी उपविभाग पदाधिकाऱ्याची नेमणूक केलेली असते. या संस्थेचें कार्य लोकल बोर्डाप्रमाणें आहे. या जिल्ह्यांत मलकापूर, खामगांव, जळगांव, मेहकर व चिखली अशा ५ जनपद सभा आहेत. त्यापैकी चिखली तालुक्याच्या जनपद सभेचें मुख्यालय बुलडाणा येथें आहे.

शिक्षण, बाजारावर नियंत्रण, यात्रा, लोकस्वास्थ्य इत्यादि बाबींवर जनपद सभेतर्फे लक्ष पुरविण्यांत येते. खड्यांतील प्राथमिक शिक्षणाची सोय जनपद सभा करते.

या जिल्ह्यांत (१) बुलडाणा, (२) चिखली, (३) देऊळगांव राजा, (४) मेहकर, (५) जळगांव, (६) खामगांव, (७) मलकापूर, (८) नांदुरा व (९) शेगांव या ठिकाणीं नगरपालिका आहेत.

नगरपालिका

नगरपालिका हद्दींतील शिक्षण, लोकस्वास्थ्य, पाणी-पुरवठा, दिवाबत्ती, बाजारपेठा व यात्रा या कार्यांवर नगरपालिकेचें लक्ष असते व त्या संस्थेमार्फत कार्ययंत्रणा चालविली जाते.

सामूहिक विकास गट.

द्वितीयावस्था △
सामूहिक □
प्रथमावस्था ▨
पूर्वावस्था ⊗



(१०) विद्युत् प्रसार

आपल्या देशांत कृषीला महत्वाचें स्थान आहे. शेतीचें उत्पादन वाढावें म्हणून सर्व बाजूंनी प्रयत्न करण्यांत येत आहेत. तेव्हां राष्ट्रीय संपत्तीचा परिपूर्ण विनियोग करून आपल्याला आपली उद्दिष्टें आणि ध्येय साध्य करावयाचें आहे.

शेतीच्या व्यवसायाला विद्युत् शक्तीची जोड मिळाल्यास शेतकऱ्यांना सिंचनासाठी इंजिन वगैरे बसविणें सुलभ जातें. ही गोष्ट लक्षांत घेऊन खेडेगांवांतून वीज खेळविण्याचें महाराष्ट्र सरकारनें ठरविलें आहे.

या जिल्ह्यांत जामोद, पिंपळगांव राजा, जलंब, चांदूर, वडनेर, सागवान, केळवद, देऊळघाट, पातुर्डा, झोडगा, पेंत्र, मलकापूर नजीक अनुराबाद, नांदुरा विकास गटांतील धानोरा, काटखेड, तिकोडी, पोतडी, संग्रामपूर विकास गटांतील वखट बकाल, संग्रामपूर, एकलारा, उमरा, बावनबीर, खामगांव विकास गटांतील कदमापूर, लोणी, पळशी बुद्रुक, पळशी खुर्द याशिवाय जळगांवजवळील सुनगांव, तसेच पिंपळगांव काळे या ठिकाणीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत वीज मिळणार होती. त्यांपैकी १० गांवांना १५ ऑगष्ट १९६० ला वीज देण्यांत आलेली आहे. कांही गांवांना ह्यापूर्वीच मिळाली आहे. आणखी इतर ठिकाणीं विद्युत् शक्ति पुरविण्याचें काम जोरांत चालू आहे.

(११) दळणवळण

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमान्वयें १ ल्या व २ऱ्या वर्गाच्या रस्त्याचें प्रमाण व त्यांची लांबी वाढली असून कित्येक सडका अस्फाल्टच्या करण्यांत आल्या आहेत. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी सडकेची लांबी ३५२ मैल होती. ती आता २ऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी ५७१ मैल झाली.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत खालील रस्ते घेण्यांत आले होते :—

	लांबी मैल
(१) सुलतानपूर ते दुसरबिड रस्ता	१५.२
(२) बावनबीर-सोनाळा रस्ता	३.६
(३) जळगांव-वरवट बकांल रस्ता	१२.४
(४) जळगांव-सुनगांव-जामोद रस्ता	६.६
(५) आकोला-खामगांव रस्त्याला मिळणारा पिंपरीगवळी रस्ता	१.५
(६) पारखेड रस्ता	१.६
(७) निमगांव-नांदुरा-जळगांवला रस्त्याला जोडणारी सडक	०.६
(८) बिस्वा-जीगांव रस्ता	५.३
(९) धरणगांव-नरवेल रस्ता	३.२
(१०) दसरखेड-म्हैसवाडी	२.४
(११) खामखेड-देवधाबा रस्ता	१.३

यापैकीं सुलतानपूर-दुसरबीड रस्त्याचें व निमगांव-नांदुरा-जळगांव या सडकेला जोडणाऱ्या रस्त्याचें बांधकाम पहिल्या पंचवार्षिक योजनेंतच पूर्ण झाले होते. शिल्लक राहिलेल्या कामांचा दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत अंतर्भाव करण्यांत आला. विद्यमान पक्या सडका व खडी यांना जोडणाऱ्या रस्त्यांची बांधकामें प्रथम हाती घेण्यांत आली. या कार्यक्रमांत खालील कामांचा समावेश आहे :—

	लांबी मैल
(१) वानखेड रस्ता	२.००
(२) पहूरजीरा रस्ता	२.०४
(३) तरवाडी जवळा बाजार रस्ता	२.१
(४) हिवरखेड रस्ता	०.४
(५) देऊळगांव माळी रस्ता	१.४
(६) बिबी मांडवा रस्ता	२.००
(७) साखळी खेडें रस्ता	२.१
(८) दाताळा उमाळी रस्ता	२.१
(९) अंत्रीखेडकर रस्ता	२.४

या बांधकामापैकी अंत्रीखेडकर रस्त्याचे (२.४) बांधकाम पहिल्या योजनेंत पूर्ण झाले व बाकीचीं बांधकामें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत जवळजवळ पूर्ण झालीत. धाड-जांब रस्ता, दुधा-हातनी रस्ता व बुलडाणा-उंद्री रस्ता ही बांधकामें त्यासाठी जनतेचे साहय मिळणार असल्याने हातीं घेण्यांत आली होती.

नांदूरा व मलकापूर यांना जोडणाऱ्या एका नवीन रस्त्याच्या बांधकामासहि सुरवात करण्यांत आली. हा मार्ग तयार झाल्यास राष्ट्रीय राजपथ क्रमांक ६ मुळें हा मलकापूरहून नांदुऱ्यास परस्पर जोडल्या जाईल आणि त्यामुळें नांदुरा ते मलकापूर हे अंतर बरेच कमी होईल. या रस्त्याचे काम जवळजवळ संपत आले असून पूल बांधण्याचें काम चालू आहे.

गिट्टीच्या सडकांचे महत्वाचें भाग अस्फाल्टचे बनविण्याच्या योजनेचा रस्ते विकासाच्या कार्य-क्रमांत समावेश करण्यांत आला. शहरें व खेडीं यांना जोडणाऱ्या सडकांचें कांही भाग अस्फाल्टचे बनविण्यांत येतील. एकूण वीस खेडचांमधून जाणाऱ्या रस्त्यांच्या कांही भागांवर अस्फाल्टचें थर देण्यांत आले असून हे काम दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत चालूं ठेवण्यांत आले होते. जिल्हचांतील महत्वाच्या रस्त्यांवरील ४६ मैल लांबीचा भाग अस्फाल्टचा बनविण्यांत आला.

राज्य योजनेंत अंतर्भाव करण्यांत आलेल्या रस्ते बांधण्याच्या कार्यक्रमाव्यतिरिक्त मालेगांव वरवट-बकाल रस्त्याचे (४॥ मैल) व लोणी-लोणार रस्त्याचें (८॥ मैल) बांधकाम हातीं घेण्यांत आलें असून त्यासाठी मध्यवर्ती पथ निधींतून आर्थिक साहच मिळत आहे. मध्यवर्ती योजनेंत राष्ट्रीय राजपथ बांधण्याची तरतूद आहे. मध्यवर्ती सरकारने ठरविलेल्या प्रमाणानुसार राष्ट्रीय राज-पथाच्या कडेची रुंदी ३८ फूट असली पाहिजे. या जिल्हयांतून जाणाऱ्या राजपथाच्या कडेची रुंदी फक्त २० फूट आहे. म्हणून अकोला-खामगांव-नांदुरा-मलकापूर-भुसावळ या रस्त्याच्या ३०.११/१६ मैलाच्या मार्गावरील रस्त्याच्या कडांची रुंदी वाढवून ३८ फूट करण्याच्या कामाचा दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समावेश केला होता.

या भागांत मलकापूर ते नांदुरा १८॥ मैलाचा नवीन रस्ता होत आहे. या रस्त्यावर बेरी, वडनेर, भोलजी व धानोरा ही गांवे आहेत. हा मार्ग पूर्ण झाल्यावर मलकापूर-नांदुरा मधील १८ मैल अंतर कमी होईल.

गजानन मोटार सर्व्हीस, सुवर्ण ट्रान्स्पोर्ट कंपनी, न्यू प्रकाश ट्रान्स्पोर्ट कंपनी, नटवर ट्रान्स्पोर्ट कंपनी, अरुण सहकारी ट्रान्स्पोर्ट कंपनी, नवजीवन ट्रान्स्पोर्ट, लोकप्रिय, प्रभात, बलवंत इत्यादि कंपनीच्या मोटार बसेस या जिल्हचांत आहेत. याशिवाय खाजगी टॅक्सी गाडचा भरपूर आहेत.

मलकापूर ते बुलडाणा व बुलडाणा ते मलकापूर या दरम्यान दर तासांनी बसेस जातात. नागपूर व मुंबईवरून मलकापूरांस येणाऱ्या प्रत्येक गाडीवर बुलडाण्यास येण्यासाठी बसेसची सोय आहे.

(१२) सर्वोदय योजना

दिनांक १ नोव्हेंबर १९५७ पासून या जिल्ह्यांत सर्वोदय योजनेस सुरवात झाली असून जळगांव तालुक्यांतील निहाल, कोरकू, गोंड, भिल्ल इत्यादि मागासलेल्या अन्य आदीवासी लोकवस्तीच्या २१ खेड्यांचा या योजनेंत समावेश करण्यांत आला आहे. या सर्वोदय क्षेत्रांतील लोकसंख्या अंदाजे २६ हजार असून जमिनीचें क्षेत्रफळ १७६,९१९ एकर आहे. त्यापैकीं ४३,५०६ एकर डोंगराळ, ७४,९०० एकर जंगल आणि ३६,६२५ एकर जमीन लागवडीखाली आहे.

सुरवातीला कार्यकर्त्यांना बऱ्याच अडचणींना तोंड द्यावें लागलें. त्यांना सर्वोदय मतप्रणाली लोकांना समजावून सांगावी लागली. तसेच या कार्याची मूलभूत कल्पना महात्मा गांधींच्या विधायक कार्याशी कशी संबंधीत आहे हेहि पटवावें लागलें. कार्याची योजना प्रमाणबद्ध व्हावी या हेतूने एक सल्लागार समिती स्थापन करण्यांत आली. त्या समितीने माजी राजकीय सत्याग्रही लोकांसाठी शेतीची योजना, जंगल कामगार संघ, तेलघाणी, सहकारी संघ, सहकारी शेती संघ, शिक्षण, सफाई शिबीर इत्यादि बाबींवर कार्यक्रम तयार केला. या योजनेवर १९५९-६० पावेतो अंदाजे ९६,७०० रुपये खर्च झाले असून खालील कार्यक्रम यशस्वी करण्यांत आला आहे.

चालढाणा येथील भूदानांत मिळालेल्या ४०० एकर जमिनीपैकी २५० एकर जमीन लागवडीखाली आणली असून या ठिकाणीं सहकारी पद्धतीनें उत्पादन काढण्याचा प्रगतीशील प्रयत्न चालू आहे. या ठिकाणीं आदीवासींची १० कुटुंबें आणि अन्य भूमिहीन १२ कुटुंबे मिळून २२ कुटुंबांनी वसाहत केली आहे. या कुटुंबांना साधारणत: ५ ते १० एकर जमीन लागवडीसाठी दिली असून कांही जमीन सहकारी पद्धतीने वहितीस आणली जाणार आहे.

१९५८-५९ सालीं जळगांव आणि चालढाणा या ठिकाणीं ५०-५० चें ५ प्लॉट तयार करण्यांत आले होते. त्यांत भेंडी, कापूस आणि पालेभाजी यांची प्रात्यक्षिकें केली. जळगांव येथील दोन गुंठे जमिनींत बुरी जातीच्या कपाशीचें उत्पन्न ५० शेर म्हणजे एकरी १। ते १॥ खंडी उत्पादन काढलें.

१९५९-१९६० सालीं चालढाणा येथें ६ एकराच्या क्षेत्रांत १७४ कपाशीचें प्रात्यक्षिक करण्यांत आले. परंतु त्यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळें पीक उत्पादनाचें बाबतीत प्रयोग अयशस्वी ठरला. १९५८-५९ सालीं पिंगळी येथील सुमारे १३१ एकर जमीन सहकारी पद्धतीने करण्यांत आली. त्याच वर्षी जिल्हा कृषि कार्यालयामार्फत कृषि सहाय्यकाची सर्वोदय क्षेत्रासाठी नियुक्ति करण्यांत आली. कृषि सहाय्यकानें कंपोष्ट खड्डे, आदर्श शेती इत्यादि बाबतींत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केलें. या योजनेमार्फत आदीवासी शेतकऱ्यांना नांगरासाठी निम्मे अनुदान देण्यांत आलें. १६ नांगर घेण्यांत आलें. बागायतीच्या प्रात्यक्षिकासाठी ४ एकराचा एक प्लॉट तयार करण्यांत आला असून त्यांत १९६०-६१ सालीं बागायतीचें प्रात्यक्षिक करण्यांत आले. अधिक धान्य पिकवा मोहिमेचा प्रचार करण्याच्या दृष्टीने रायपूर, सायखेडा आणि वसाडी येथें पिक स्पर्धा घडवून आणली. १९६०-६१ सालीं शेतकऱ्यांना या योजनेमार्फत सुधारलेल्या ज्वारीचे ४५ पौंड व २,४३६ पौंड सरकी वाटण्यांत आली तसेच बंगाली ३३ मण हाडांचे खत पुरविण्यांत आलें. शिवाय ४०० रुपये कर्जाच्या स्वरूपांत फळझाडांच्या कलमा खरेदीसाठी देण्यांत आलें.

सर्वोदय क्षेत्रांतील तीन खेड्यांतून किसान सेना उभारण्यांत आली. १९५८-५९ सालीं या संघटनेंत १५ सभासद होते. यांतील कांही सभासदांना आदर्श शेती दाखविण्यासाठी मेहकर, चिखली इत्यादि तालुक्याचा दौरा काढण्यांत आला. उत्तम पिकें व त्याचबरोबर सहकारी शेती पद्धतीने उत्पन्न वाढवून गांवाची सुधारणा कशी घडवून आणतां येईल हे १९६० सालीं या क्षेत्रांतून दिल्ली येथील जागतिक कृषि प्रदर्शन पाहण्यासाठी याच शेतकऱ्यांना पाठविण्यांत आले होते. १९५८-५९ सालीं जामोदला आणि १९५९-६० सालीं बावनबीर येथें लहान प्रमाणांवर एक कृषि व पशू प्रदर्शन भरविण्यांत आलें व उत्तम कास्तकारांना बक्षिसें देण्यांत आली.

किसान सेना

सर्वोदय योजनेच्या वतीने १९५८-५९ सालीं दोन विहिरी खोदण्यासाठी मदत देण्यांत आली.

या क्षेत्रांत महारोगाचें प्रमाण शेकडा ७ असे सांगण्यांत येते परंतु मे १९५८ मध्यें अमरावती येथील ८ प्रशिक्षणार्थ्यांनी सर्वोदय क्षेत्रांतून कुष्ठरोगाची पाहणी केली. २६ गांवांतून १६,१२९ लोकांना तपासले तेव्हां १२७ कुष्टरोगी असल्याचे आढळून आलें.

सर्वोदय क्षेत्रांतील कुष्ठरोग निर्मूलन

बावनबीर येथें कुष्ठरोग निर्मूलन केन्द्र उघडण्यांत आले असून १९५९-६० सालीं १,३५३ रोग्यांवर औषधोपचार करण्यांत आला. जळगांवलाहि त्यावर्षी एक उपकेन्द्र सुरू केले. येथील रोग्यांची संख्या २१ आहे. बावनबीर केन्द्रास स्थानिक कार्यकर्त्यांच्या सर्वोदय सेवा मंडळाने आपल्या मालकीच्या जमिनीपैकीं २ गुंठे जागा उपचार केन्द्राची खोली बांधण्याकरिता देणगी म्हणून दिली.

प्रसुतिगृहाची अडचण लक्षांत येतांच या योजनेमार्फत एक प्रसूतिगृह बांधण्याचें ठरविलें व त्याकरिता जनतेनेहि सक्रिय सहकार्य देऊन पांच हजार रुपये जमा केले. योजनेमार्फतहि रक्कम मंजूर झाली असून बांधकामासाठी श्री. शेगोकार यांनी आपल्या मालकीची १३॥ गुंठे जमीन या कार्यासाठी दान दिली. बांधकामास सुरुवात झाली आहे.

प्रथमोपचारासाठी योजना क्षेत्रांत ५ ठिकाणीं प्रथमोपचार पेटया ठेवल्या असून एकूण ५०० रुपयांची औषधी वाटण्यांत आली.

जळगांव येथें विद्यार्थ्यांचा एक संघ स्थापन केला असून त्यांना आसनें, मालीश, सूर्यस्नान, बाष्पस्नान यांचे प्रात्यक्षिक शिकविले जाते.

ग्राम सफाई शिबीर

दिनांक २ ते १६ ऑक्टोबर १९५८ पावेतो ग्रामसुधार सप्ताह पाळण्यांत आला. तसेच सफाई शिबीरहि घेण्यांत आलें. हा पहिलाच प्रसंग असल्यामुळें थोडया अडचणींना तोंड द्यावे लागलें. परंतु संचालकांच्या योग्य मार्गदर्शनामुळें शिबीर फारच यशस्वी झालें. त्या कालावधींत गोपुरी शौचघर, एक कच्चे मुत्रीघर, ८१ शोष खड्डे, ६ शोष नाली, एक आदशघर, ८ स्नानगृहें, १ गोठा आणि ५ कंपोष्ट खड्डे इत्यादि कामें झाली. दुसरें शिबीर बावनबीर येथें २० ते२४ मार्च १९६० पर्यंत घेण्यांत आलें. या वेळी ५ गोपुरी संडास, ९८ शोष खड्डे, ८९ स्नानगृहें, ३ कंपोष्ट खड्डे व २ आदर्श गोठे इत्यादि काम झालें.

१९५९-६० सालीं तेलघाणीसाठी आर्थिक साह्य देण्यांत आले. तसेच उद्योग स्वावलंबन या दृष्टीने ४८५ गुंडी सूत कातले गेले व वस्त्र स्वावलंबनांतून ५५ वार खादी विकल्या गेली.

टुनकी, आलेवाडी, वसाडी, खापरखेर्डा या ठिकाणीं आदीवासी महिला मंडळे स्थापन करण्यांत आली. मार्च १९६० मध्यें बावनबीरला एक आदीवासी शिबीर आयोजीत केले होते.

(१३) जंगलें

राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेंत जंगलांना फार महत्वाचें स्थान आहे. वनसंवर्धन व जंगलाचा पावसावर होणारा परिणाम या दोन्ही दृष्टीने जंगलें महत्वाचीच ठरतात. वन संपत्तीचा विकास व तिचा उपयोग हा जमीनीचा जास्तीत जास्त उपयोग करण्याच्या कार्यक्रमाचा एक अविभाज्य भाग आहे.

या जिल्ह्यांत जंगलाचें एकूण क्षेत्र ४४६ चौरस मैल आहे. म्हणजे एकूण क्षेत्रफळाच्या सुमारे ११ टक्के आहे.

आंबाबरवा हे राखीव जंगल जळगांव तालुक्याच्या अगदी उत्तरेस सातपुड्यांत नेमाड जिल्ह्या-लगत आहे. तसेच या जिल्ह्यांत दक्षिणेस अगदीच हलक्या प्रतीचेहि जंगलें आहेत. या तालुक्यांतील जंगलांची अ, ब, क अशा तीन वर्गांत विभागणी केलेली आहे.

'अ' श्रेणीचें जंगल इमारती लांकूड, सर्पण याकरितां, 'ब' श्रेणीचें जंगल गुरांसाठी लागणाऱ्या गवतासाठी, 'क' श्रेणीचें जंगल गुरांसाठी चराईचा भाग म्हणून राखून ठेवण्यांत आलें आहे.

प्रशासनासाठी जंगलाचे चिखली, मेहकर, खामगांव व जळगांव असे चार भाग आहेत.

जंगलांतील झाडांची उंची ३५ फूटापर्यंत आहे. लहान लहान झाडाझुडपांचा उपयोग सर्पणासाठी करण्यांत येतो. मुख्यत: या जिल्ह्यांत खालील प्रकारचे इमारती व जळाऊ लांकूड आहे.

साग.---कांही भागांत होते. परंतु ते अयोग्य प्रमाणांत वाढते त्यामुळें इमारतीच्या कामीं त्याचा उपयोग होत नाही. या लांकडाचा बल्ली व लहान गोल म्हणून उपयोग करण्यांत येतो.

अंजन.---अंजनाच्या पाल्याचा चारा म्हणून उपयोग केल्या जातो. बुलडाणा डोंगराच्या पायथ्याशीं राजूर खेड्याजवळ याचे प्रमाण बरेच आहे. तसेंच जळगांव तालुक्यांत व खामगांव तालुक्यां-तील गेरूमाटरगांव या राखीव जंगलांत अंजनाची बरीच झाडें आहेत. या झाडाचा इमारतीच्या कामीं जास्त प्रमाणांत उपयोग करण्यांत येत नाही कारण हे लांकूड हलक्या प्रतीचे समजल्या जाते.

बाभूळ.---बाभळीची झाडें या जिल्ह्यांत बरीच आहेत. या लांकडाचा जाळण्यासाठी व इमारती-साठी उपयोग करण्यांत येतो.

सालई.---ही झाडें फारच थोड्या प्रमाणांत आहेत. अत्यल्प प्रमाणांत जळगांव तालुक्यां-तील कांही भागांत बांबूची झाडें दिसतात. या जिल्ह्यांत खालील ठिकाणीं राखीव जंगलें आहेत :—

(१) **आंबाबरवा**.---जळगांव तालुक्यांत असून याचे क्षेत्रफळ सुमारे ५४ चौरस मैल आहे. या भागांत कोरकू व निहाल हे लोक राहतात. वसाडी व पिंगळी या ठिकाणीं वन विभागाचें साठे आहेत.

(२) **घाटबोरी**.---मेहकर तालुक्यांत असून क्षेत्रफळ अंदाजे ४५ चौरस मैल आहे. येथेंहि अंजनाची झाडें आहेत.

(३) **उत्तर आमदरी जंगल**.---हे सुमारे २५ चौरस मैल आहे.

(४) **दक्षिण आमदरी जंगल**.---याचे क्षेत्र फारच कमी आहे.

(५) **गुणी**.---चिखली प्रक्षेत्रांत आहे. याचे क्षेत्रफळ सुमारे १० चौरस मैल आहे.

(६) **भोनगांव**.---हे जंगल शेगांव भागांत असून येथें बाभूळ जास्त प्रमाणांत आहे.

(७) **गेरूमाटरगांव**.---खामगांव तालुक्यांत असून येथे अंजनाची झाडें बरीच आहेत.

संभाव्य विकासासाठी भक्कम पायाची उभारणी करणें व ज्या जंगलाचे उत्पादन कमी असेल त्यामध्यें भरपूर पैदास करण्याची तरतूद करणें हे वनसंवर्धन योजनेचे उद्दिष्ट लक्षांत ठेवून या जिल्ह्यांत कार्यक्रम आंखण्यांत आला आहे.

वनसंवर्धनाचा कार्यक्रम

खामगांव नजीक जनूना वन विभागातर्फे एक नर्सरी उघडण्यांत आलेली आहे. तसेच बुलडाणा येथें संगमतलावावरहि एक उद्यान तयार करण्याचे वन विभागाने ठरविले व तेथे झाडाची लागवडहि सुरू केली.

आगीमुळें किंवा इतर कारणाने नुकसान पोहोचलेल्या शेतकऱ्यांना व मजूरांना घरें किंवा गुरांचे गोठे बांधण्यासाठी जंगलांतील सामुग्री आदेशानुसार विनामूल्य देण्यांत येते. ठेकेदाराला विकलेल्या कुप्समधील सर्पण व इमारती लांकूड व इतर वस्तू बाजार दरांपेक्षां निम्या दरानें शेतकऱ्यांना देण्यांत येतात. या सवलतीनुसार एका शेतकऱ्याला इमारती लांकडांचे जास्तीत जास्त दहा ओंढे व दहा गाड्या सर्पण देण्यांत येते. यासाठी खेड्याची विशिष्ट कूप्समध्यें वर्गवारी करण्यांत आली आहे. कुप्समधील झाडें तोडून शेतकऱ्यांना सर्पण व इमारती लांकूड यांचा पुरवठा करण्याचीहि व्यवस्था केलेली आहे. शहर विभागांतील शेतकऱ्यांना व मजूरांनाहि गवत व सर्पण यांचा सवलतीच्या दराने पुरवठा करण्याची व्यवस्था करण्यांत आली असून उपयुक्त सामुग्री संबंधितांना प्रमाणीत दाखविल्यावर मिळू शकते. शेतकऱ्यांना आंबाबरवा राखीव जंगलांतून गुरांना लागणारे गवत विनामूल्य नेता येते. तसेच शेतकऱ्यांच्या सोयीकरितां त्यांना गांव पाटील व ग्रामपंचायती यांच्यामार्फत प्रमाणीत दाखले देण्याचीहि व्यवस्था करण्यांत आली आहे.

पिडित व्यक्ति वगैरेंना सवलती

(१४) शैक्षणिक प्रगति

शिक्षण हे जीवनाची पूर्व तयारी नसून शिक्षण म्हणजेच जीवन होय. हे तत्व मान्य केल्यापासून शिक्षणशास्त्रांत मूलोद्योगाला विशेष प्राधान्य मिळू लागले.

या जिल्ह्यांत शैक्षणिक विकासाच्या कार्यक्रमाचें आपणांस खालीलप्रमाणें वर्गीकरण करतां येईल :—

(१) पूर्व-प्राथमिक, (२) प्राथमिक (मूलोद्योगासह), (३) माध्यमिक, (४) महाविद्यालयीन, (५) तांत्रिक व (६) शारिरीक इत्यादि.

बालक मंदिरें

बुलडाणा जिल्ह्यांत पूर्व-प्राथमिक शाळा १३ असून त्या शाळेंत एकूण ५६२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ही संस्था वाढती आहे.

प्राथमिक

पहिल्या पंचवार्षिक योजनेपूर्वी प्राथमिक शाळा आणि शिक्षकांची संख्या अनुक्रमें ५१२ आणि ९७७ इतकीं होती. परंतु नंतर बरीच प्रगति होऊन मार्च १९६० अखर ९२८ मुलांच्या आणि ४० मुलींच्या प्राथमिक शाळा सुरू झाल्या, त्या शाळांत एकूण ६०,७६० विद्यार्थी आणि २५,३२४ विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत. १,८४१ अध्यापक-अध्यापिका काम करतात.

शहर विभागांतून आणि राष्ट्रीय विकास गटांतून सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू करण्याचे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ठरविले होते. त्याप्रमाणें शगांव, देऊळगांव राजा, बुलडाणा, चिखली, मलकापूर, खामगांव इत्यादि ठिकाणीं सक्तीचे शिक्षण सुरू झाले आहे. प्राथमिक शिक्षणाच्या क्षत्रांत कार्य करणाऱ्या खाजगी संस्थांना नवीन शाळा उघडण्यासाठी, उत्तेजन देण्यासाठी आणि चालू शाळच्या व्यवस्थसाठी आर्थिक सहाय्यहि देण्यांत आले.

मूलोद्योग शिक्षण

मूलोद्योग शिक्षण पद्धतीचा प्राथमिक आणि भारतीय माध्यमिक विद्यालयांतून स्विकार करण्यांत आला. त्यामुळें विद्यमान प्राथमिक शाळांचें मूलोद्योग शाळांत रूपांतर करण्याचें आणि या विद्यालयातून विणकाम, सूतकताई, शेती आणि हस्तकला आदींचे शिक्षण देण्याचे ठरविण्यांत आलें व त्याप्रमाणें कार्य होत आहे.


प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाची सोय

वाढती गरज पुरविण्यासाठी शिक्षकांची संख्या वाढत गेली. शिक्षकाला शिकविण्याचे काम शास्त्रीयदृष्टचा करतां यावे म्हणून त्यांच्यासाठी बुलडाणा येथे प्रशिक्षणाची सोय करण्यांत आली. बुलडाण्याला एक बुनियादी प्रशिक्षण महाविद्यालय चालू करण्यांत आलें. त्या महाविद्यालयासाठीं ५,६२,५०३ रुपये खर्च करून इमारत बांधण्यांत आली. या बुनियादी प्रशिक्षण महाविद्यालयांत ३०० शिक्षक प्रशिक्षित करण्याची सोय करण्यांत आली.

दुय्यम शिक्षण


पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर भारतीय पूर्व-माध्यमिक शाळांची संख्या ९० होती. ती आतां १३६ झाली आहे. तसेच आंग्ल पूर्व-माध्यमिक विद्यालय १५ आहेत. या जिल्ह्यांत माध्यमिक शिक्षणाची सोय खाजगी संस्थांनीहि बरीच केलेली आहे. त्या संस्थांना शासनाकडून दरसाल अनुदान मिळत असते. राज्यांतील साक्षरता १०० टक्केपर्यंत वाढविण्याचा मनोदय मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी अनेक वेळा बोलून दाखविला आहे, आर्थिक दृष्टीने मागासलेल्या पालकांच्या बालकांना शिक्षण मिळावें म्हणून १,२०० रुपयेपर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्यास मोफत शिक्षण देण्यांत येते.

औद्योगिक


कापसाचे जीन
घोंगडी
हातमाग
जळगांव
मलकापूर
नांदुरा
शेगांव
खामगांव
चिखली
मेहकर
सारंगपूर
सुलतानपूर
देऊळगांव राजा
सिंदखेड
लोणार

4-A

दळणवळण.


रेल्वे मार्ग
राजपथ
इतर मार्ग
चालू असलेलें काम
जळगांव
जामोद
वसाडी
सोनाळे
बावनबीर
टुणकी
वानखेड
मनार्डी
पातुर्डी
आसलगांव
पिंपळगांव काळे
खांडवी
भुसावळ कडे
चांदूर बिस्वा
मलकापूर
नांदुरा
जलंब
शेगांव
नागपूर कडे
खामगांव
आकोला कडे
धामणगांव
मोताळा
बोथा
बुलडाणा
देऊळघाट
दुधा
धाड
हातणी
महारखेड
उंद्री
अमडापूर
उत्रादपेठ
चिखली
म्हसला
जांब
चौकी
अं. खेडकर
लव्हाळा
जानेफळ
साखरखेर्डा
डोणगांव
आकोल्या कडे
अंढेरा
मेहकर
देऊळगांव राजा
सुलतानपूर
बीबी
दुसरबीड
सिंदखेड
लोणार
जालन्याकडे

जिल्ह्यांत एकूण ६५ माध्यमिक विद्यालयें आहेत. त्यापैकी ५ मुलींची विद्यालयें आहेत. मुलांसाठी ४ उच्च माध्यमिक विद्यालयें आहेत. माध्यमिक शाळेंत एकूण १९,८६९ मुलें-मुलीं शिकतात. या जिल्ह्यांत ३ सरकारी माध्यमिक शाळा आहेत. तसेच मुलींची एक शाळा आहे.

केन्द्रीय सरकारने सप्टेंबर १९५२ मध्यें माध्यमिक शिक्षणाची पाहणी करून सुधारणा सुचविण्यासाठी डॉ. ए. लक्ष्मणस्वामी मुदलीयार यांच्या अध्यक्षतेखाली माध्यमिक शिक्षण आयोगाची नियुक्ति केली होती. त्या आयोगाच्या शिफारसीनुसार मध्यप्रदेश सरकारने १९५५ सालीं प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणीं एक बहुद्देशीय उच्च माध्यमिक विद्यालय उघडलें. त्याप्रमाणें शासनानें बुलडाणा येथे एक बहुद्देशीय उच्च माध्यमिक विद्यालय उघडलें आहे. उच्य माध्यमिक विद्यालयांत व्यवसायीन शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवले जाते.

महाविद्यालयें

खामगांव येथील गोविंदराम सक्सेरिया वाणिज्य महाविद्यालयांत विज्ञान आणि कला हे विषय शिकविले जातात. अमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण संस्थेने १९५६-५७ पासून बुलडाणा येथे कला महाविद्यालय उघडलें आहे. या जिल्ह्यांतील एकूण १,१७९ विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षण घेत आहेत.

विशेष विद्यालयें.

खामगांव येथील टिळक राष्ट्रीय विद्यालय हे या जिल्ह्याचे एक वैशिष्टय आहे. राष्ट्रीय वृत्तीचा विकास करण्यासाठी हे विद्यालय १९२१ मध्यें स्थापन करण्यांत आले. स्वातंत्र्य प्राप्तिनंतर या विद्यालयानें ग्रामीण उन्नती व सेवाभाव उत्पन्न करणारी विशिष्ट शिक्षण पद्धति अंगिकारली. या विद्यालयांत वर्ग ५ ते १० पर्यंत शिक्षणक्रम आहे. सर्वोदय प्रवेश परीक्षा ही वर्ग १० ची परीक्षा आहे. ही परीक्षा टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, ह्यास संलग्न केली आहे.

या शाळेचें प्रत्येक इमारतीचें बांधकाम श्रमदानाने पूर्ण केले आहे. कलाभवनाच्या इमारतीची शिल्परचना आकर्षक आहे.

वस्त्र स्वावलंबन, कताई, सफाई, प्रार्थना, शरीर परिश्रम हें सर्वांच्या दैनिक जीवनाचा मुख्य भाग आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती येथें मिळतात. तसेच चित्रकला, मूर्तिकला, गायन, नृत्य, नाटय ह्या ललितकलांची उपासनाहि येथें अखंड चालूं असते.

ग्रामसेवक प्रशिक्षण केन्द्र

२ आक्टोबर १९५२ पासून भारतांत विकास योजनेचा कार्यक्रम सुरू झाला. हा कार्यक्रम खेड्याच्या सर्वांगीण विकासासाठी चालू आहे. खेडयांत नवजीवन निर्माण करण्याचें प्रयत्न करण्यांत येत आहेत. ग्राम विकासाचा कार्यक्रम जनतेपर्यंत पोहोचविण्याचें आणि विकासाचा संदेश त्यांच्या मनांत बिंबविण्याचें काम ग्रामसेवकाला करावे लागते. ग्रामसेवक हा विकास योजनांचा कणा म्हणून ओळखल्या जातो. ज्या विविध जबाबदाऱ्या ग्रामसेवकाला पार पाडाव्या लागतात, त्या लक्षांत घेऊन ग्रामसेवकांसाठी प्रशिक्षणाचा कार्यक्रम आंखण्यांत आला.

बुलडाणा येथें अशा प्रकारच्या प्रशिक्षणाचा वर्ग नोव्हेंबर १९५९ पासून सुरू करण्यांत आला. येथें सुमारे ६९ विद्यार्थी असून त्यांना बागाईत, पिकसंरक्षण, भूसंरक्षण, जमीनसुधारणा, पशुसंवधन चिकित्सा, लोकशिक्षण, सहकार, सार्वजनिक आरोग्य वगैरे विषयासंबंधी शिक्षण दिले जाते. प्रशिक्षणार्थ्यांची निवड शासनातर्फे करण्यांत येते. शिक्षणक्रम दोन वर्षाचा आहे.

सुतारकाम प्रशिक्षण.—सुतारकामाचें प्रशिक्षण देण्यासाठी बुलडाण्यास एक प्रशिक्षण केंन्द्र आहे.

कांचेचीं खेळणीं तयार करण्याचें प्रशिक्षण——खामगांव येथें कांचेचीं खेळणीं तयार करण्याचें ६ महिन्याचें शिक्षण देण्यात येते. प्रशिक्षणार्थ्यांना शिक्षणासाठी कांही प्रमाणांत आर्थिक सहाय्य मिळते.

लोक शिक्षण

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत लोकशिक्षणाचें १,५६९ वर्ग भरविण्यांत आलें आणि त्यांतून ३१,३९९ प्रौढांना साक्षर करण्यांत आलें. पैकी ६,९८५ प्रौढांना साक्षरतेचें दाखले देण्यांत आलेंत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत ७३९ लोकशिक्षण वर्ग भरविण्यांत येणार होते. त्यांपैकी १९५६-५७ सालीं १४६ वर्ग सुरू करण्यांत आलें, १९५७-५८ सालीं ६३ वर्ग सुरू करण्यांत आलें. १९५८-५९ सालीं १०४ वर्ग आणि १९५९-६० सालीं १७६ वर्ग चालू होते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस ५,३२५ प्रौढांना साक्षर करण्यांत आलें.

इतर मंडळें

लोक शिक्षणांतर्गत १९५९-६० साली १०९ युवक मंडळें सुरू करण्यांत आली. तसेच १४७ शेतकरी संघ आणि ५० महिला मंडळें स्थापन करण्यांत आली. ११४ वाचनालयांना शासनातर्फे आर्थिक साहय देण्यांत आलें. ६० भजनी मंडळांची स्थापना झाली.

वाचनालय योजना

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत बुलडाणा येथें जिल्हा वाचनालय उघडण्यांत आलें. या वाचनालयाचा फायदा शहर भागांतील २४ केन्द्रांना आणि ग्रामीण भागांतील ६० केन्द्रांना मिळत आहे. याशिवाय पथप्रदर्शक योजनेखाली १०५ ग्रामीण केन्द्रें उघडण्यांत आली आहेत. या वाचनालयांत लघुकथा, ऐतिहासिक, सामाजिक तसेच पौराणिक विषयावरील पुस्तकें आणि इतर प्रकारचें वाचन साहित्य ठेवण्यांत येते. नवसाक्षर लोकांनी शिकलेलें विसरूं नये आणि त्यांच्यांत वाचनाची गोडी निर्माण व्हावी हाच फिरती वाचनालयें सुरू करण्याचा उद्देश आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ४५० गांवासाठी फिरत्या वाचनालयाच्या ९८ पेटचा ठेवण्यांत आल्या होत्या. आता त्या पेटचांची संख्या ११८ झाली आहे.

उन्हाळी शिबीरें

खेडेगांवांतील नेत्यांना प्रशिक्षण देण्यासाठी ही शिबीरें भरविण्यांत येतात. पहिल्या पंचवार्षिक योजनेपूर्वी अशाप्रकारची ३ उन्हाळी शिबीरें भरविण्यांत आली होती आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत २२ उन्हाळी शिबीरें भरविली गेली असावीत. १,२०० ग्रामीण नेत्यांना ग्रामविकासाचें सांगोपांग प्रशिक्षण देण्यांत आलें.

युवक शिबीरें

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत शहर आणि ग्रामीण भागांतील शाळा कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या आणि इतर युवकांच्या सहकार्याने चार शिबीरें घेण्याचा कार्यक्रम आखला होता. त्यांत सार्वजनिक उपयुक्ततेच्या सामूहिक कामावर भर देण्यात आला.

लोकशिक्षणाच्या क्षेत्रांतील कामें करणाऱ्या इसमांना प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने १६ प्रशिक्षण केन्द्रें उघडण्याचा विचार आहे.

शाळेंत अभ्यासक्रमाबरोबरच खेळ, विज्ञान, संघ, बालवीर, ए. सी. सी., एन्. सी. सी. इत्यादि शिक्षणाचीहि सोय झालेली आहे.

मागासलेल्या विद्यार्थ्यांस सवलती

मागासलेल्या वर्गांतील विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या शैक्षणिक सवलती देण्यांत येत आहेत. मलकापूर, बुलडाणा, चिखली, पातुर्डा व पाडळी ह्या ठिकाणीं मागासलेल्या जातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहें आहेत. तसेच चिखली येथें सर्व जातींतील विद्यार्थ्यांना राहता येईल असे एक वसतिगृह आहे. ह्या सर्व वसतिगृहांत सुमारें २३३ विद्यार्थी राहत आहेत. पाडळी येथे एक असेच वसतिगृह असून तें भारत सेवक समाज चालविते.

(१६) कुटिरोद्योग व हस्तकला

ग्रामोद्योग व छोटे उद्योगधंदे हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा अविभाज्य घटक होय. हे धंदे ग्रामीण भागांतील लोकांना कामधंद्याच्या अधिक संधी मिळवून देतात. त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढते. राहणीच्या मानांत सुधारणा व ग्रामीण अर्थव्यवस्थेंत समतोलपणा ठेवता येतो. ग्रामीण अर्थव्यवस्था जसजशी विकसीत होईल त्यानुसार औद्योगिकरण वाढत जाईल.

या जिल्ह्यांत खालील औद्योगिक सहकारी संस्थांची स्थापना झालेली आहे :—

विणकर सहकारी संस्था

हातमाग उद्योग हा या भागांतील एक प्रमुख गृहोद्योग आहे. या धंद्यांवर बऱ्याच लोकांचा चरितार्थ चालत असल्यामुळे या धंद्याच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष पुरविण्यांत येत आहे. या जिल्ह्यांत सहा विणकर सहकारी संस्था सुरू झाल्या असून देऊळगांवराजा व नांदुरा येथें उत्तम प्रकारे त्या चालू आहेत. ह्या सहकारी संस्थांना शासनातर्फे आर्थिक साह्य आणि कर्जहि देण्यांत आलें. घरगुतीरीत्या लोकर बनविण्याचा उद्योग विकसित करण्यासाठी खामगांव येथें लोकर विणण्याचे केन्द्र सुरू करण्यांत आलेले आहे.

सुतारी सहकारी संस्था

या जिल्ह्यांत सुतारी सहकारी संस्थांची संख्या ६ आहे. सुतारी सहकारी संस्थांच्या स्थापनेमुळे सुतारांना चांगली मजूरी मिळूं लागली व त्यांचा धंदा वाढूं लागला आहे.

जंगल कामगार सहकारी संस्था.

आदिवासींच्या सर्वांगीण उन्नतीच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून समाज कार्यकर्त्यांच्या मदतीने आदिवासी व इतर जंगल कामगारांच्या दोन सहकारी संस्था या जिल्ह्यांत निर्माण करण्यांत आल्या. आदिवासींना योग्य वेतन मिळावे व धंद्यांतील नफा त्यांच्या पदरांत पडावा एवढीच दृष्टी या योजनेच्या मुळाशी नाही. आदिवासी जनतेला आपल्या सांघिक, शारिरीक व बौद्धिक बलाच्या आधारावर कार्य करण्याचे वळण व शिक्षण लाभावे हें ह्या योजनेचे उद्दिष्ट आहे. तसेंच वन्यजमातीचे राहणीचें मान सुधारावे व त्यांची नैतिक, सामाजिक व शैक्षणिक सुधारणा व्हावी हाहि या योजनेचा हेतु आहे. या शिवाय खालील सहकारी संस्था कार्य करीत आहेत :—

(१) चर्मकार सहकारी संस्था	१४
(२) तेली सहकारी संस्था	५
(३) बांबू व वेत सहकारी संस्था	२
(४) कुंभार काम, चूना व विटा सहकारी संस्था ...	३
(५) लोहारी सहकारी संस्था	१
(६) रंगाई व छपाई सहकारी संस्था	१
(७) महिला सहकारी संस्था]	१
(८) इतर सहकारी संस्था	५

वैयक्तिक कर्ज वैयक्तिकरीत्या काम करता यावे म्हणून सुतार, लोहार, फोटो फरेम करणारे वगैरे कारागिरांना सामान व औजारें घेण्यासाठीहि कर्ज देण्यांत येते.

प्रशिक्षणाच्या सोयी शिवणकाम, चर्मकला, सुतार व लोहारकाम, कुक्कुटपालन, दोर तयार करणें, वेत व बांबूचें काम, तेलघाणी व कांचेची खेळणी तयार करण्यासाठी प्रशिक्षणाचीहि सोय करण्यांत आली असून ह्या व्यवसायांत ७७८ प्रशिक्षणार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले आहे.

प्रशिक्षणाचे वर्ग खालीलप्रमाणें आहेत :—

गटाचें नांव		प्रशिक्षण
(१) शेगांव विकास गट	...	(१) चर्मकला प्रशिक्षण केन्द्र.
		(२) बांबूकाम प्रशिक्षण केन्द्र.
		(३) शिवणकला प्रशिक्षण केन्द्र.
(२) नांदुरा विकास गट	...	(१) सुतारकाम प्रशिक्षण केन्द्र.
		(२) शिवणकला प्रशिक्षण केन्द्र.
(३) जळगांव विकास गट	...	(१) कुंभारकाम प्रशिक्षण केन्द्र.
		(२) बांबूकाम प्रशिक्षण केन्द्र.
		(३) शिवणकला प्रशिक्षण केन्द्र.
		(४) चर्मकला प्रशिक्षण केन्द्र.
(४) मेहकर विकास गट	...	(१) सुतारकाम प्रशिक्षण केन्द्र.
		(२) चर्मकला प्रशिक्षण केन्द्र.
(५) बुलडाणा विकास गट	...	शिवणकला प्रशिक्षण केन्द्र.
(६) संग्रामपूर विकास गट	...	(१) शिवणकला प्रशिक्षण केन्द्र.
		(२) चर्मकला प्रशिक्षण केन्द्र.
(७) खामगांव विकास गट	...	(१) शिवणकला प्रशिक्षण केन्द्र.
		(२) दोर तयार करणें प्रशिक्षण केन्द्र.
		(३) कातडी कमाविणें.
(८) मोताळा विकास गट	...	चर्मकला प्रशिक्षण केन्द्र.

(१६) आरोग्य

जिल्ह्यांतील आरोग्य व्यवस्थेबाबतची जबाबदारी जिल्हा स्वास्थ्य अधिकारी यांच्याकडे आहे. रोग प्रतिबंधक उपाय व वैद्यकीय सोयींची वाढ करणें ही काम ह्या खात्यामार्फत होतात. दवाखान्यावरील देखरेख सिव्हिल सर्जन करीत असतात.

खेडें विभागांत जनपद सभा व नगर विभागांत नगरपालिका सार्वजनिक आरोग्याकडे लक्ष पुरवितात. कांही ठिकाणीं सरकारी दवाखानेहि आहेत. शिवाय स्त्रियांसाठी स्वतंत्र दवाखानेहि आहेत. १९५०-५१ च्या सुमारांस या जिल्ह्यांत २४ दवाखाने होते. पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत आणखी ४ दवाखानें उघडण्यांत आले. अशाप्रकारें या जिल्ह्यांत दवाखान्यांची संख्या एकूण २८ झाली असून त्यांपैकी १७ दवाखाने ग्रामीण विभागांत आहेत.

दवाखान्यांतील खाटांची संख्या २२९ होती. ती आता जवळ जवळ दीडपट वाढविण्यांत आली आहे.

बुलडाणा येथील मुख्य दवाखान्याला, शेगांव येथील सईबांई मोटे हॉस्पिटलला आणि खामगांव येथील स्त्रिया-मुलांचे ज्युबिली मेमोरियल दवाखान्याला प्रांतीक दवाखान्याचा दर्जा देण्यांत आला आहे. त्यामुळे ह्या दवाखान्याच्या सोयींत सुधारणा होईल.

प्राथमिक आरोग्य केंद्र

खेड्यांतील लोकांना औषधोपचाराच्या सोयी उपलब्ध व्हाव्यांत या हेतूने बुलडाणा, शेगांव नांदुरा, मेहकर, जळगांव, खामगांव व संग्रामपूर येथील विकास गटांत प्राथमिक आरोग्य केन्द्र उघडण्यांत आलें. केन्द्रानजिकच्या खेड्यांना या केन्द्रापासून भरपूर फायदा मिळत आहे.

कुटुंब नियोजन

कुटुंब नियोजनाचें महत्त्व लक्षांत घेऊन या जिल्ह्यांत ६ कुटुंब नियोजन केन्द्रें उघडण्यांत आलीं असून येथें कुटुंब नियोजनासंबंधीं माहिती तर दिली जातेच शिवाय आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या इसमांना अल्प किंमतींत उपकरणें व साहित्य पुरविले जाते. पुरुषांना कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया करून घेता यावी म्हणून निरनिराळ्या ठिकाणीं शिबीरें घेण्यांत येत आहेत. शिवाय बुलडाणा येथील मुख्य दवाखान्यांत केव्हाहि शस्त्रक्रिया करून घेण्याची सोय आहे. मासिक १५० रुपयापेक्षां कमी उत्पन्न असलेल्यांना सरकारतर्फे १० रुपये मदतहि मिळते.

क्षयरोग आरोग्यधाम, बुलडाणा

भारतांत प्रतिवर्षी क्षयरोगानें सुमारें २५ लक्ष लोक आजारी पडतात व जवळ जवळ ५ लक्ष मृत्यू पावतात. हा रोग अत्यंत तापदायक असून वर्षानुवर्षे रोग्याला छळत असतो. निरनिराळ्या दवाखान्यांतून क्षय रोग्यासाठी अधिक रुग्णशय्यांची सोय केली जात आहे. क्षयरोग प्रतिबंधक उपाय, रोग्यांची शुश्रुषा करण्याचें ज्ञान, शहर विभागांतून नगरपालिकेने करावयाची आरोग्य तपासणी, स्वच्छता प्रसार व योग्य प्रमाणांत शुद्ध अन्नपाणी मिळण्याच्या सोयी इत्यादि उपायांनी भारतांतील क्षयरोग नाहिसा करण्याचें प्रयत्न होत आहेत. बी. सी. जी. टीकांचा प्रसार आणि प्रचार झपाट्याने होत आहे.

१९३० च्या सुमारास हिंदुस्थान सरकारच्या एका क्षयरोग तज्ञाने बुलडाणा भागाचीं पाहणी करून आरोग्यधामासाठी बुलडाण्याजवळच्या जागेची शिफारस केली होती.

१९४७ सालीं मध्यप्रदेश सरकारच्या त्यावेळच्या आरोग्यमंत्री महोदयांनी बुलडाण्यास भेट दिली असतां जवळपास कुठेतरी क्षयरोग आरोग्यधाम व्हावे अशी शिफारस केली होती. तेव्हांच्या पाहणीवरुन असे दिसून आले की बुलडाण्याच्या थंड हवेमुळेच आजूबाजूच्या भागांतील कांही क्षयरोगी तेथे येऊन राहत. क्षयरोग तज्ञ डॉक्टर नसतांहि येथील दवाखान्यातून आणि खाजगी डॉक्टर यांजकडून उपचार करून घेत.

त्यावेळच्या मध्यप्रदेश विधान सभेचे उपसभापति कै. पंडीत कानडे शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली १९५० मध्यें एका क्षयरोग प्रतिबंधक समितीची स्थापना झाली. समितीतर्फें धनिक वर्गांकडून देणगीच्या रूपाने निधी जमविण्यांत आला आणि तज्ञ डॉक्टर व स्थापत्य विशारद यांच्या सहकार्याने जागेची पहाणी करून २४ जून १९५२ रोजीं मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री पं. रविशंकर शुक्ल यांच्या हस्ते शिलान्यास समारंभ झाला. त्या वेळी डॉ. राजकुमारी अमृत कौर यांनी पं. शुक्लाजीकडे संदेश पाठवन हे आरोग्यधाम लवकर तयार व्हावे अशी विनंती केली. १९५२-५३ सालीं पूर्व नियोजित इमारतींचें बांधकाम जोराने सुरूं झालें.

इमारत बांधण्यासाठी ३ लाख रुपयांपेक्षाहि जास्त निधी देणगीच्या स्वरूपांत जमा करण्यांत आला सध्या या आरोग्यधामांत १३५ रोग्यांच्या औषधोपचाराची सोय करण्यांत आली असून सुसज्ज असे क्ष-किरणाचें उपकरणेहि आहेत. तसेच इतर परिक्षणासाठी प्रयोगशाळाहि आहेत.

या आरोग्यधामाचा फायदा महाराष्ट्रांतील सर्व जिल्हयांतील लोक घेत आहेत. त्यांतल्यात्यांत बुलडाणा, अकोला, यवतमाळ, अमरावती, औरंगाबाद, जळगांव, परभणी व नागपूर ह्या जिल्हयांतील लोकांनी विशेष फायदा घेतला.

या आरोग्यधामांत शुल्क शय्या आणि निःशुल्क शय्या अशी व्यवस्था आहे. तसेच रोग्यासाठीं कुटिरांचीहि व्यवस्था आहे.

रोग्यांच्या मनोरंजनासाठी आरोग्यधामांत रेडिओ बसविला असून प्रत्येक वॉर्डांत लहान ध्वनि-क्षेपक ठेवण्यांत आले आहेत. वाचनालयाची व बैठ्या खेळाचीहि स्वतंत्र सोय केली आहे. रोग्यांच्या मनाला विरंगुळा मिळावा म्हणून काही हस्तकलेचे कार्मांह सुरूं केलेले आहे. त्यांत शिवणकाम, टेबलक्लॉथ तयार करणें, पिशव्या तयार करणें इत्यादींचा समावेश आहे.

सध्या क्षयरोग आरोग्यधामांतील रुग्णशय्यांची सोय पुढील प्रमाणें आहे :—

(१) कुटीर ८
(२) पैसे देणारे (१.५० रु. प्रतिदिन) ... २४ (पुरुष).
(३) पैसे देणारे (१.५० रु. प्रतिदिन) ... १० (स्त्रिया).
(४) निःशुल्क शय्या ... ... ३३ (पुरुष), १० (स्त्रिया).
(५) एस्. आय. डी. शय्या ५

या शिवाय १९६० च्या अखेरीस कांही निःशुल्क शय्या वाढविल्या.

गेल्या ३ वर्षातील लाभ

साल	भरती झालेलें रोगी	रोगमुक्त होऊन गेलेले रोगी	मृत्यू	दुरुस्त झाल्याचें शेंकडा प्रमाण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१९५८ ...	१६७	१२६	८	९१.३
१९५९ ...	२२२	१६४	१	८७
१९६० ...	२५५	२६९	६	९७.६
	(१९५९ सालांतील कांही रोगी यांत आहेत).			

रोग्याला देण्यांत येत असलेलें भोजन—

(१)	भात	२३३ ग्रॅम.
(२)	गहूं (आटा)	२९२ ग्रॅम.
(३)	दाळ (तूर)	८७ ग्रॅम.
(४)	भाजीपाला	२३३ ग्रॅम.
(५)	कांदे	११७ ग्रॅम.
(६)	गोडें तेल	२९ ग्रॅम.
(७)	डालडा	२९ ग्रॅम.
(८)	मीठ	१५ ग्रॅम.
(९)	चहा	१० ग्रॅम.
(१०)	साखर	५८ ग्रॅम.
(११)	सर्पण	१,३९७ ग्रॅम.
(१२)	दूध	५८३ ग्रॅम.
(१३)	फळ	१.
(१४)	मटन	११७ ग्रॅम (आठवड्यांतून ३ वेळां).
(१५)	अंडे	१.
	मिष्टान्न	आठवड्यांतून ३ वेळा.
	रवा	५८ ग्रॅम.
	साखर	५८ ग्रॅम.
	डालडा	२९ ग्रॅम
	किसमीस	५८ ग्रॅम (सात रोग्यासाठी).

दुधावर राहण्यासाठी—

(१)	दूध	९३० ग्रॅम.
(२)	फळें	२.
(३)	साखर	५८ ग्रॅम.

कुष्टरोग निवारण केन्द्र

या जिल्ह्यातील महारोगासंबंधी प्राथमिक पहाणी करून उपाययोजना करण्यासाठी खामगांव येथें कुष्टरोग निवारण केन्द्र उघडलें आहे. याशिवाय जळगांव तालुक्यांत कुष्टरोग निवारणाचे कार्य होत आहे.

ग्रामीण भागांत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा

सामुदायिक विकास योजनेतर्फे या जिल्ह्यांत सुमारे ८० नवीन विहीरी पिण्याच्या पाण्यासाठी खोदण्यांत आल्या असून २५० विहीरी दुरुस्त करण्यांत आल्या आहेत. तसेच ४५ हजार फूट लांबीच्या नाल्याहि ग्रामीण भागांत बांधण्यांत आल्या. याशिवाय १५,००० शोष खड्डे खोदण्यांत आले आणि ३६४ संडास बांधण्यांत आले. मेहेकर येथील पैनगंगा नदीवर पिण्याच्या पाण्याची योजना हातीं घेतली आहे.

मलेरिया निर्मूलन कार्य

हिमज्वराचें निर्मूलन करण्यासाठी जळगांव तालुक्यांत १९५३ पासून काम सुरू करण्यांत आलें. १९५३ सालीं या जिल्हयांत ४४,७७९ लोकांना हिमज्वर झाला होता. त्यावेळेला जिल्हयांत जे एकूण रोगी होते त्यापैकी शेकडा १५ लोक हिमज्वरानें ग्रासलेले होतें. १९५९ सालीं हे प्रमाण फारच कमी झालेलें आढळून आले. त्यावर्षी फक्त २१,६१४ लोकांत हिमज्वराचें जंतू दिसून आले.

या कार्यक्रमानुसार जून ते आक्टोबर अखेर पर्यंत डी. डी. टी. फवारण्याचें कार्य करण्यांत येत असते. १९५९-६० सालीं या जिल्हयांत सुमारे १,९१,०६४ पौंड डी. डी. टी. फवारण्यांत आली.

हिमज्वर निर्मूलन कार्यासाठी बुलडाणा येथे जिल्हा मलेरिया अधिकारी यांचे कार्यालय असून चिखली, खामगांव, मलकापूर व मेहकर अशी चार उपकेन्द्रे आहेत. खामगांव उपकेन्द्राकडे खामगांव व जळगांव तालुक्याचे काम सोपविण्यांत आले आहे. त्याकरितां चार हिमज्वर पर्यवेक्षक (मलेरिया सुपरवायझर) दोन तंत्रज्ञ, चार हिमज्वर निरक्षक, एक सहाय्यक उपकेन्द्र अधिकारी, ३० श्रेष्ठ प्रक्षेत्र कर्मचारी, १० प्रक्षेत्र कर्मचारी (बाराहि महिन्यासाठीं) व १६० प्रक्षेत्र कर्मचारी पांच महिन्यासाठी व कार्यालयांस लागणारा इतर कर्मचारी वर्ग आहे.

जिल्हयांतील दवाखाने

(अ) नगरपालिकेकडून चालविण्यांत येणारे दवाखाने.—

(१) चिखली. (२) मलकापूर. (३) मेहकर.

(ब) सरकारी दवाखाने.—

(१) प्रमुख दवाखाना, बुलडाणा.

(२) ज्युबिली मेमोरियल स्त्रियां व मुलांचा दवाखाना, खामगांव.

(३) सईबाई मोटे दवाखाना, शेगांव.

(४) सरकारी क्षयरोग आरोग्यधाम, बुलडाणा.

(क) जनपद सभेतर्फे चालविण्यांत येत असलेले दवाखाने, खालीलप्रमाणें असून तेथील सहाय्यक चिकित्सक अधिकारी सरकारतर्फे नेमण्यांत येतो :—

(१) देऊळगांव राजा.

(२) अमडापूर.

(३) धाड.

(४) पाडळी.

(५) धामणगांव.

(६) बोराखेडी.


(७) वडनेर भुजंगी.

(८) तामगांव (संग्रामपूर)

(९) पिंपळगांव काळे.

(१०) सोनाळा.

आरोग्य व्यवस्था


प्राथमिक आरोग्य केंद्र- असलेले विकास गट
सरकारी दवाखाने
स. क्षयरोग आरोग्यधाम
नगरपालिकेकडून चालविण्यांत येणारे दवाखाने
जनपद सभेतर्फे चालविण्यांत येत असलेले दवाखाने
कुटुंब नियोजन केंद्र
जामोद
सोनाळा
जळगांव
वरवंट बकाल
पिंपळगांव काळे
संग्रामपूर
मलकापूर
नांदुरा
शेगांव
धामणगांव
मोरखेडी
पिंपळगांवराजा
खामगांव
बुलढाणा
पाडळी
लाखनवाडा
किन्होळा
धाड
अमडापूर
चिखली
जानेफळ
साखरखेर्डी
डोणगांव
मेहकर
देऊळगांव राजा
किनगांवराजा
लोणार

(क)—पुढे चालू

(११) जामोद.

(१२) पिंपळगांव राजा.

(१३) साखरखेर्डा.

(१४) बोरी अडगांव.

(१५) लोणार.

(१६) डोणगांव.

(१७) किनगांव राजा.

(ड) प्राथमिक आरोग्य केन्द्र—

(१) नांदुरा.

(२) शेगांव.

(३) जळगांव.

(४) किन्होळा.

(५) लाखनवाडा.

(६) संग्रामपूर.

(७) जानेफळ.

(इ) कुटुंब नियोजन केन्द्र—

(१) शेगांव.

(२) वरवट बकाल.

(३) नांदुरा.

(४) जळगांव.

(५) किन्होळा.

(६) जानेफळ.

(फ) खाजगी मदतीवर चालविण्यांत येणारा दवाखाना—

खामगांव व मलकापूर येथे आहेत.

(१७) जिल्ह्यांतील वैशिष्टयपूर्ण स्थळें आणि हौशी प्रवाशांचीं आकर्षणें

मुंबईमार्गे नागपूर विभागांत जाण्यासाठी हा जिल्हा प्रवेशद्वार आहे असे समजण्यांत येते. मोगल, निजामशाही, विजापूरचे राज्य, नागपूरचे भोसले ह्यांच्या लढाईसंबंधीच्या व इतर हालचाली येथें चालत. उत्तरेकडून दक्षिणेकडे आणि दक्षिणेकडून उत्तरेकडे येथूनच जावे लागे. त्यामुळें ह्या जिल्ह्याला ऐतिहासिक महत्वहि प्राप्त झालेलें आहे. अलिकडे विकास कार्यक्रमाच्या बाबतींतहि हा जिल्हा बराच आघाडीवर आहे.

ऐतिहासिक स्थळें

सिंदखेड राजा.—असामान्य राजपुरुष स्वराज्य संस्थापक महाप्रतापी श्री. छत्रपती शिवाजी महारांजाच्या मातोश्री जिजाबाईचे हे माहेर. हा गांव मेहकर तालुक्यांत असून मेहकराच्या आग्नेयेला देऊळगांव राजापासून ९ मैलावर आहे. या ठिकाणीं राजे लखुजी जाधव यांनी बांधलेली व त्यांच्या राज्य वैभवाची साक्ष देणारी आजहि बरीच स्मारकें, भवनें, तलाव, महाल व तट कायम आहेत. राजे जगदेवरावांनी बांधलेले राजे लखुजीरावांचे स्मारक चांगल्या स्थितींत आहे. स्मारकाची लांबी-रुंदी व उंची समान असून वर घुमट आहे. पूर्वेकडील दरवाज्यावर एक लेख आहे. त्यांत अशी माहिती आहे: "शिंदखेडचे देशमुख भानवसे विठोजी सौ. आरधांगी ठाकराई राणी त्यांचे पोटी जाधवराव लुकजी महाराज अर्धांगी गिरजाई राणी त्यांचे पोटी पुत्र दत्ताजी व अंचलजी व राघोजी राजे जाधवराव लुकजी पुत्र दत्ताजी त्यांचे पोटी यशवंतराव राजे लिंबाजी." हा संपूर्ण लेख कांही भग्न स्थितींत आजहि पाहावयास मिळतो. राजे लखुजी महाराजांच्या दगडी महालाचा तीन मजली दर्शनीय भाग कायम आहे. हा राजे लखुजी महाराजांनी बांधला होता. याच महालाच्या तळाशीं तळघर आहे, असें म्हणतात. इ. स. १६३२-३३ च्या सुमारास बाल शिवाजी सिंदखेडला आले असतांना याच तळघरांत राहिले असावेत असे विद्वानांचें मत आहे.

भपजी उर्फ जगदेवराव यांनी गांवापासून सुमारे एक मैल अंतरावर सहा लाख रुपये खर्च करून तलाव बांधला. दगडी थोपेला मध्यभागीं तळघरासारखे असून येथून पाणी बाहेर सोडण्याची व्यवस्था फारच कुशलतेने केलेली आहे. पाणी सोडण्याची जी छिद्रें केली आहेत ती सर्व छिद्रे वाटेल तेव्हां बंद करतां येतात. या तलावाला कांहीं भागांत जीवंत पाणी आहे. याशिवाय सावकार वाडा (सरकारवाडा असेहि म्हणतात); चांदनी तलाव, काळाकोट, रंगमहाल, रामेश्वर, निळकण्ठेश्वर मंदीर इत्यादि अवशेष आहेत.

फत्तेखेर्डा.—मेहकर तालुक्यांतील भोगवती नांवाच्या लहान नदीच्या कांठावर चिखलीपासून सुमारे १९ मैलावर वसले आहे. या गांवाचे मूळचे नांव साखरखेर्डा होतें. परंतु इ. स. १७२४ सालीं मोगलांचा मुबारकखां आणि निजामाचा निजाम उल्-मुल्क ह्यांची लढाई झाली. या लढाईंत निजामाला विजय मिळाला, म्हणून या गांवाला फत्तेखेर्डा म्हणूं लागले. या गांवाच्या दक्षिणेला या लढाईची समरभूमि आहे.

या ठिकाणीं 'पलसि सिद्ध' यांची समाधि आहे. इ. स. १७७४ सालीं मुबारकखां लढाईंत येथें मरण पावला. त्यांची कबरहि येथे आहे. खुदावंदखां महदवी याने येथे इ. स. १५८१ च्या सुमारास एक मशीद बांधली. या मशीदीच्या पूर्व दरवाज्यावर एक पर्शियन लिपींत लेख असून इ. स. १५८१ च्या सुमारास ही मशीद बांधली आहे असा त्यांत उल्लेख आहे. ही मशीद पूर्णपणें दगडाची बांधलेली असून दगडांची मांडणी लोखंडांत केली आहे.

रोहिणखेडा.—मलकापूर तालुक्यांत बुलडाण्यापासून सुमारे १५ मैलावर आहे. इ. स. १४३७ च्या सुमारास खानदेशचा सुलतान नाझीरखांने त्याचा जांवई, अल्लाउद्दीन बाहामनीवर स्वारी केली. १५९० च्या सुमारास अहमदनगरच्या राजकुमार बुरहानने खानदेशचा राजा अलीखानच्या बरोबर

जमालखांनवर याच ठिकाणीं स्वारी केली. अशा प्रकारें रोहीणखेडा दोन लढाईचें मैदान बनले. १५८२ सालीं खुदावंदखां महदवीने बांधलेली मशीद येथे आहे. या मशीदीच्या भिंतीवर पाणी शिंपडल्यास भिंतीवर पर्शियन लिपींत लिहिलेला मजकूर स्पष्ट दिसतो.

देऊळगांवराजा.—सिंदखेड येथील जाधव घराण्यांतील कांहीं लोक या ठिकाणीं स्थायीं झाले. गांवच्या पूर्वेस चौकोनी आकाराची कोरीव दगडाची समाधि आहे. तिला गोल घुमट असून बाजूस खांब आहेत. हिची घडण मोगल पद्धतीची असून ती आनंदराव महाराजांच्या मुलीची समाधि आहे. तिला 'मोठी समाधि' असे लोक म्हणतात. परंतु ती 'चिमकाबाईसाहेबांची समाधि' आहे असे इतिहासकार म्हणतात.

मलकापूर.—मुहांमद मलिकखांच्या कारकीर्दींत इ. स. १७२९ च्या अंदाजांत ह्या गांवासभोवती तट बांधण्यांत आला होता. या तटाला एकूण चार दरवाज आहेत. मलकापूर नरनाळचाच्या सरकारची राजधानी होती असे ऐन-ई-अकबरी या ग्रंथांत उल्लेख आहे. हे शहर खानदेशमधील फारुकी घराण्यांतील राजाने सुमारे ५०० वर्षापूर्वी वसविले. त्याने आपल्या मलिका राजकुमारीच्या नांवावरून ह्या गांवाला नांव दिलें होतें. निजामने ह्या ठिकाणीं आपल्या संरक्षणार्थ वीस हजार फौज ठेवली होती. ब्रिटीशांचे राजदूत कर्नल कॉलीन यांनी दौलतराव शिंदे व राघुजी भोसले ह्यांना आपले अधिकारपत्र मलकापूरला इ. स. १८०३ सालीं दिले. १८४९ सालीं मलकापूरला ५ पिलाई (जिनींग) कारखान होते असा उल्लेख सांपडतो. येथे एक मशीद असून ती फार जुनी आहे, असा स्थानिक लोकांचा समज आहे.

देऊळघाट.—याचे प्राचीन नांव देवळी होते. इ. स. १७०० च्या सुमारास औरंगजेब बादशहाचा एक सरदार नझारउद्दीन या ठिकाणीं राहून दख्खन भागांतील हालचालीवर नजर ठेवत असे. शेख अहमद तहसीलदाराने ह्या गांवासभोवती तट बांधला. पूर्वी या ठिकाणीं तहसीलचे मुख्यालय होते.

जानेफळ.—मेहेकर तालुक्यांत मेहेकरपासून १० मलावर असून पूर्वी हें गांव देऊळगांवराजा येथील यादवांच्या मालकीचे होते. मेहेकर सरकारची एके काळीं येथे राजधानी होती असे म्हणतात. गांवाच्या मध्यभागी हलती दीपमाळ आहे.

शहापूर.—खामगांव तालुक्यांत असून अकबर बादशहाच्या मुलानें, राजकुमार मुरादशाह, याने हे गांव वसविले असे म्हणतात. याच ठिकाणीं मुराद मरण पावला असे म्हणतात.

पिंपळगांव राजा.—हे गांव गुराख्याच्या घराण्यांतील राजाने सुमारे ८५० वर्षापूर्वी वसविले आहे.

हेमाडपंथी मंदिरें

सातगांव.—चिखलीपासून १० मैलावरील या गांवी जैनांची आणि हिंदूंची अशी एकूण चार मंदीरें आहेत. ही मंदीरें जीर्णावस्थेंत आहेत. ही मंदिरे हेमाडपंथी असून ११ ते १४ व्या शतकाच्या सुमारांस बांधली असावीत असा अंदाज आहे. विष्णूची मूर्ति येथील हिंदू मंदिरांत आहे.

देऊळघाट.—हेमाडपंथी मंदिराचे अवशष फक्त शिल्लक आहेत. औरंगजबच्या काळांत येथील मंदिरें नष्ट करण्यांत आली असे म्हणतात.

धोत्रा.—या खेड्यांत वस्तीपासून २ फर्लांगावर हेमाडपंथी पद्धतीचे एक शिवाचे मंदिर आहे. ह्या मंदीराचे छत्र चार खांबावर आधारलेले आहे.

कोथळी.—यथ विश्वगंगा नदीच्या तीरावर महादेवाचे हेमाडपंथी मंदिर असून त्याच्यासमोर गणपतीचें मंदिर आहे.

मढ.—येथे पैनगंगेचा उगम झाला असून महादेवाचे हेमाडपंथी मंदिर आहे. ह्या ठिकाणीं चक्रधर स्वामी राहत होते असे स्थानिक लोक सांगतात.

साकेगांव.—या ठिकाणीं महादेवाचे हेमाडपंथी मंदिर आहे. ह्या मंदीरांत शिवाची तांडव मूर्ति व महाकालीची मूर्ति आहे.

सांस्कृतिक देवस्थाने

शेगांव.—महाराष्ट्रांतीलच नव्हे तर भारतांतील कांही भागांतून भाविकांचे थवे ह्या गांवी येऊं लागले आहेत. श्री गजानन महाराजांची समाधि याच ठिकाणी आहे. दर गुरुवारी भाविकांची गर्दी जमते. रेल्वे मार्गावर असल्यामुळें येथे जाणे-येणें सोयीचे आहे.

श्री क्षेत्र नागझरी.—श्री. गोमाजी महाराजांची येथे समाधि आहे. श्री. गोमाजी महाराजांनी ह्या ठिकाणी सुमारे १०० वर्षापूर्वी समाधि घेतली होती असे सांगतात. येथे एक अखंड वाहणारी पाण्याची 'धार' आहे. धारेला गोमुख म्हणतात. येथे भागवत धर्माचे वर्ग घेतले जातात.

देऊळगांव राजा.—नागपूर विभागांतील सर्वांत श्रीमंत देवस्थान म्हणून येथील बालाजी संस्थानाची गणना होते. येथील बालाजीच्या मूर्तिची उंची फक्त अडीच इंच आहे.

मेहेकर.—शिल्पशास्त्र परिपूर्ण असलेली १० फूट उंचीची काळया दगडाची विष्णूची सुंदर मूर्ति या ठिकाणीं आहे. ही मूर्ति या ठिकाणी इ. स. १८८८ साली सांपडली. दीड लाख रुपये खर्च करून बालाजीचें मंदिर उभारण्यांत आले. दंतकथेनुसार 'मेघनकर' नांवाचा राक्षस या ठिकाणीं राहत असे त्याच्यापासून बऱ्याच लोकांना त्रास होऊं लागला. त्याचा नाश करण्यासाठी विष्णुला विनंती करण्यांत आली. विष्णूने 'शारंगधराचा' अवतार घेऊन त्या राक्षसाचा नाश केला. 'मेघनकर' चा अपभ्रंश होऊन 'मेहेकर' असे लोक या गांवाला म्हणूं लागले.

भाविकांची इतर स्थानें

पिंपळगांव देवी—देवीचे मंदिर; **कलंबेश्वर**—पद्मावतीचे मंदिर; **मांसरुळ**—महादेवाचे मंदिर; **सोनाळा**—सोनाजी बाबाची समाधि; **अमडापूर**—देवीचे मंदिर; **चंडोल**—चिखली तालुक्यांतील या गांवीं चार मंदिरें आहेत. त्यापैकी दोन महादेवाची आणि नृसिंह व महालक्ष्मी यांची दोन. **धानोरा**—या ठिकाणीं संत महासिद्ध यांची यात्रा; **ढालसावंगी**—येथे मुरदादी; कालिका आणि महादेव यांची मंदिरें ; **इटखेड.**—दत्तात्रयाचे मंदिर; **जळगांव**—राजा भतृहरीचे मंदिर आहे.

निसर्गरम्य स्थळें

या जिल्हयांत अंजिटा आणि सातपुडा या पर्वतांचे फाटे पसरलेले असल्यामुळें नयनमनोहर नैसर्गिक सृष्टि सौंदर्य स्थळें बरीच आहेत.

बुलडाणा.—याला पूर्वी 'भिल्ल ठाणा' असे म्हणत होते. परंतु त्याचा अपभ्रंश होऊन बुलडाणा म्हणूं लागले. हे समुद्रीसपाटीपासून २,१९० फूट उंच असून विदर्भातील दुसऱ्या क्रमांकाचें थंड हवेचे ठिकाण आहे. ह्या ठिकाणीं उतरण्यासाठीं विश्रामगृह व विश्रामभवन आहेत. याशिवाय २—४ लॉजेस आहेत.

लोणार.—विदर्भांतील जुने शहर म्हणून याचा उल्लेख करण्यांत येतो. कृतयुगांत हें गांव वसविले असावे, असे कांहींचे मत आहे. गांवाच्या पश्चिमेस एक मोठा तलाव असून वरच्या बाजूला 'धार' आहे. धारेला गोमुख म्हणतात. धारेचा उगम गंगा नदीपासून झाला असे म्हणतात. अनेक वर्षापासून ही धार सतत वाहत आहे. तलावाच्या तिन्हीं बाजूने डोंगर आहे व त्याच्या पूर्वेला सुंदर डाकबंगला आहे. बंगल्यांतून तलावाचे दृष्य अतिशय नयनमनोहर दिसते. तलावावरील घाट व मंदिर प्रेक्षणीय आहे.

१०५ फूट लांबीचे व ८४½ फूट रुंदीचे पूर्वाभिमूख दैत्यसूदन मंदिर गांवाच्या मध्यभागी असून तेराव्या शतकाच्या शेवटी बांधण्यांत आले असे म्हणतात. हे लवणासूरच्या वधाच्या विजयाप्रीत्यर्थ बांधले आहे. विष्णूने दैत्यसूदनाचे रूप धारण केले होते म्हणून त्याला दैत्यसूदन मंदिर म्हणतात.

आंबाबरवा.—जळगांव तालुक्यांतील वसाडी या सडकेच्या गांवापासून ८ मैलावर आहे. त्याची उंची समुद्रसपाटीपासून २,३०० फूट आहे. येथे वन विभागाचा डाकबंगला आहे.

मढ.—पाडळी जवळील या गांवीं सृष्टीसौंदर्य चांगले आहे. तेथून अजिंठा फारच जवळ आहे.

विकास केन्द्रें

नळगंगापूर.—बुलडाण्यापासून मलकापूर रोडवर १५ मैलावर ही वसाहत आहे व तेथें नळगंगा नदी प्रकल्पाचे काम चालू आहे. हे धरण जवळ जवळ दीड मैल लांबीचे व ९६ फूट उंचीचे राहील व २ कोटीच्या वर खर्च होईल. जून १९६२ मध्यें पूर्ण होईल असा अंदाज आहे.

शेंबा.—नांदुरा विकास गटांतील आदर्श गांव; येथे कृषि विद्यालयहि आहे.

निमगांव.—शेंब्याप्रमाणेंच सुधारलेले असून येथील ग्रामसेवकाचा त्या वेळच्या मुंबई राज्यांत १९५९-६० सालीं प्रथम क्रमांक लागला होता.

अंत्रज.—मागासलेल्या जातीच्या लोकांसाठी समाज कल्याण विभागातर्फे येथे घरें बांधली. तसेच मलकापूर पांग्रा येथेहि अशी घरें बांधली आहेत.

बोरजवळा.—गांवांतील सर्व गोठे गांवाबाहेर बांधण्यांत आले.

सावरगांव डुकरे.—हे पुढारलेले गांव आहे. येथे ग्रामोद्योग संस्था बऱ्याच आहेत. 'ग्रामरक्षक' दल बुलडाणा पोलिसाच्या सहाय्याने उभारण्यांत आले असून त्यांत १० ते १८ वर्षें वयाची मुलें आहेत. त्यांना कवाईत शिकविली जाते.

बुलडाणा.—येथे टिळक राष्ट्रीय क्रिडा मंदिर, क्षयरोग आरोग्यधाम व ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र आहे.

पाडळी.—आदर्श गांव असून या गांवांतील लोकांनी आरोग्य व इतर सोयी उपलब्ध करून घेतल्या आहेत. या गांवांत सुमारे १ लाख रुपये किंमतीचे बांधकाम झालें.

खेर्डा.—सहकारी चळवळींत आघाडीवर असलेले गांव.

केळवद.—सहकारी पद्धतीवर जिनींग फॅक्टरीची सोय.

औद्योगिक बाबतींत पुढें असलेली नगरें

बुलडाणा.—जिल्ह्याचे मुख्य ठिकाण व गुळाचा धंदा.

चिखली.—तालुक्याचे मुख्य ठिकाण. सोमवारी बाजार. बैल व गुळ मुख्य धंदा.

देऊळगांव राजा.—हातमाग बरेच असून कुंकू तयार केले जाते.

खामगांव.—जिल्ह्यांत मोठे शहर, तहसीलचे मुख्यालय, कापसाचे जिनींग व प्रेसिंगचे कारखाने, तेलघाणे, साबण, फिनाईल, बिस्किटे यांचे कारखाने, कापसाचा बाजार.

शेगांव.—कापसाचे जीन प्रेस, तेलघाणी, वनस्पतीचा कारखाना.

मेहकर.—तहसीलचे मुख्यालय, कापसाचे जीनींग व प्रेसींग फॅक्टरी.

मलकापूर.—धान्याचा मोठा बाजार; कापसाचे जीनींग व प्रेसींग कारखाने.

नांदुरा.—कापसाचे जीन.

शिकारीची सोय

परवाना असल्याशिवाय या जिल्ह्यांत शिकार करतां येत नाही. खालील ठिकाणीं ससे, पक्षी, मोर, हरिण, डुक्कर व क्वचित प्रसंगी चित्ता अगर वाघ मिळतो :—

(१) गेरुमाटरगांव राखीव जंगलांच्या सुमारे ८० चौ. मैलाच्या परिसरांत.

(२) आंबाबखा.—या गांवाच्या सुमारे ५० चौ. मैलाच्या परिसरांत.

(३) घाटबोरी.—मेहेकर तालुक्यांतील या ठिकाणच्या सुमारे ४० चौ. मैलाच्या परिसरांत.

(४) उत्तर व दक्षिण आमदरी जंगलांत सुमारे २५ चौ. मैलाच्या टापूत शिकार मिळते.

(५) चिखली तालुक्यांतील गुमी जंगल, व शेगांव नजीकच्या भोगांव भागांत येथे शिकारीला जाण्याची सोय होऊं शकते.

(६) लोणार, रोहीणखेडा, इत्यादि ऐतिहासिक स्थळांजवळ खास शिकार मिळूं शकते.

(१८) आदिवासी लोक व त्यांचें जीवन

या जिल्ह्यांतील ११ टक्के क्षेत्र जंगलाने व्यापलेले आहे. जंगल भागांत दळणवळणाच्या सोयी कमी असल्यामुळें येथील लोकांचे जीवन वेगळेच बनले आहे. ते सुधारणेच्या जगापासून दूर राहिले.

या जिल्ह्यांतील जळगांव तालुक्यांत कोरकू व निहाल आणि मेहकर व चिखली तालुक्यांत बंजारा जमात आहे. ह्या जमातींची अदिवासींत गणना होते.

येथील बंजारा हे मद्रासकडील 'लंबाडीस' या जातीसारखी आहे. बंजारा स्वतःला रजपूत समजतात. कांही बंजारा स्वतःला 'लभाणा' समजतात. बंजाराच्या जातीचे एकूण ६ पोट-भाग आहेत.

बंजारा

बंजारा या शब्दाचा अर्थ 'गुरांचें राज्य' असा आहे. ते या भागांत सुमारें इ. स. ४ शतकापासून राहत आहेत, असे मानण्यांत येते. बंजाराचें प्रमुख सरदार भणजी नाईक व झंजी नाईक हे आसफखान बरोबर विदर्भ भागांत आले असे इतिहासकार म्हणतात. त्यावेळीं त्यांचेजवळ सुमारे १९०,००० बैल होते, हे बैल चांगले राहावे व त्यांना भरपूर चारा मिळावा म्हणून त्यांनी खालीलप्रमाणें आसफखानकडून परवाना मिळविला. "रंजन का पानी छपर का घास दीन का तीन खून माफ" "और जहां आसफखां के घोडे वहां भंजी झंजी के बयल" त्यामुळे जर बैलांना पाणी मिळाले नाही तर राजणांतील पाणी पाजण्यांत येत असे. गवत न मिळाल्यास झोपड्यांचे गवत बैलांना चारण्यांत येई. जर यांत कोणी अडथळा केला तर दिवसा तीन खून केले तरीहि त्याला माफ करण्यांत येई. त्यावेळीं त्यांचा धंदा बैलाच्या पाठीवर माल टाकून मालाची वाहतूक करणें हा होता. आज बंजारा समाज जवळ जवळ स्थायीक झाला आहे. ते शेती व शेतमजूरीची कामें करूं लागले आहेत. लांकूड तोडून विकणें, अंजनाचा पाला एकत्रित करून विकणें, इत्यादि व्यवसाय करूं लागले आहेत. जंगलांत राहिल्यामुळें साक्षरतेचें प्रमाण अति अल्प आहे. ह्या समाजांतील बाया 'लहेंगा', चोळी, डोक्यावर उंच खूंट आणि कानाजवळ केसांना कर्णफुलासारखे दोन दागिने बांधतात. पुरुष मात्र धोतर व शर्ट आणि लहान फेटा बांधूं लागले आहेत.

यांच्यांत बालविवाहाची पद्धत नाही. मुलाची निवड करतांना तो निर्धन असेल याकडे विशेष लक्ष देतात. कारण यांच्यांत घरजांवई ठेवण्याची पद्धत आहे. परंतु ही पद्धत नाहीशी होत आहे. मुलगी साधारणतः १४ वर्षाची झाली की लग्न करण्यांत येते. त्यांच्यांत आतापर्यंत द्विभार्या पद्धत होती.

कोरकू

'कोरकू म्हणजे आगे कूच' असा अर्थ होतो. त्यांच्या कुटुंबांत कोणी मनुष्य मरण पावला की ते ती जागा सोडून पुढे आगे कूच करीत असत. त्यांचे गांव म्हणजे ५-६ झोपड्यांचा समुच्चय, त्यांचे कपडे म्हणजे डोईला चिंध्याचें मुंडासें आणि कमरेला लंगोटी सारखा 'पालू'. मुलगी बालवयाची असल्यास जवळ जवळ नग्नच असते. कमरेसभोवती लुगड्याचा पदर चोळीसारखा गुंडाळण्यांत येतो. कांही बाया चोळी घालूं लागल्या आहेत.

कोरकूच्या रुमा, राजवाडा, आणि बोंडई, कोरकू अशा पोट-जाती समजण्यांत येतात.

लग्नाच्या बाबतींत त्यांच्यात स्वयंवराच्या पद्धतीप्रमाणें एक पद्धत आहे. स्वयंवराच्या वेळीं पाटलांस बोलविण्यांत येते आणि तो मुख्य पाहुणा समजण्यांत येतो. ह्या पद्धतींत स्वयंवराच्या पूर्वी सुमारें १५—२० दिवस अगोदर गांवाच्या मध्यभागीं सुमारें ४० फूट उंचीचा खांब रोवण्यांत येतो. त्याला दररोज तेल लावून चोपडा करतात. स्वयंवराच्या दिवशीं त्या खांबाच्या वरच्या टोकाला नारळ व गुळाचा खडा ठेवण्यांत येतो. स्वयंवराच्या दिवशी सायंकाळीं गांवांतील तरुण लोक तेथें जमतात. गांवांतील इतर लोक खांबाच्या सभोवती वर्तुळाकार बसतात. खांबाजवळ तरुण येऊन उभें राहतात. त्यानंतर विवाहकांक्षी तरुणी जमतात. प्रत्येकीच्या हातांत बांबूची बारीक काठी असते. तरुण खांबावर चढूं लागतो त्यासरशी तरुणी खांबाजवळ येतात व त्याला मारूं लागतात. जो तरुण खांब चढून जातो व गूळ खातो आणि नारळ घेऊन परत येतो तो विजयी

समजला जातो. नंतर तो आपल्या आवडत्या तरुणीजवळ जातो आणि सर्वासमक्ष तिच्या पदराला हिसका मारतो व तिला नारळ देतो. नारळ प्रदान करणे म्हणजेच विवाह विधि होय. घरजांवई करण्याची पद्धतहि कोरकू लोकांत आहे.

ही सुद्धा एक भटकी जात असून ती या जिल्ह्यांत फारच कमी प्रमाणांत सांपडते. ते शिकार करून पोट भरतात. ह्या जातीचें पुढील पोट-भाग समजण्यांत येतात.—शिकारी, फांस आणि लंगोटी पारधी. लंगोटी पारधी आता पूर्णपणें स्थायिक होत आहेत. त्यांच्यांतील लग्न विधि मात्र थोडा विचित्र आहे. देवीचें देव काय आरंभतात, म्हणजे घरांतील सर्व देव एकत्र आणतात. त्यांच्या चार बाजूला ज्वारीचें धांडे रोवतात व त्यांवर कपडा टाकतात. जोडप्याला बोलावण्यांत येते. नवऱ्या मुलीच्या डोक्यांवर पाण्यानें भरलेलीं पांच मडकीं ठेवण्यांत यतात व नंतर ती जोडी त्या देवाभोवती फिरते. त्यानंतर ती जोडी एकाच ताटांत जेवण्यास बसते. एकमेकांच्या डोक्यावर अन्न फेकतात. त्या देवामध्यें देवीला मध्यभागी ठेवण्यांत येते.

पारधी

यांनाच कांही लोक कोली किंवा निहाल असे म्हणतात. ही जात दरवडेखोर म्हणून प्रसिद्ध आहे. त्यांची संख्या फारच कमी आहे व ते आता लांकूड तोडणें व विकण्याचे काम करूं लागले आहेत.

निहाल

मेहकर तालुक्याच्या दक्षिण भागांत ही जात दिसून येते. हे स्वतःला मराठा समजतात. ते शिवाचें भक्त आहेत.

बंजारा

हौशी प्रवाशयांची आकर्षणें:



(१४) प्रसिद्धि, ग्रामीण परिसारण योजना व इतर माहिती

प्रत्येक मंगळवारी आणि शुक्रवारी अखिल भारतीय आकाशवाणीच्या प्रादेशिक केन्द्रांवरून म्हणजेच, नागपूर, पुणें व मुंबई ह्या केन्द्रांवरून खेडयांतील श्रोत्यांसाठी व विशेषतः शेतकऱ्यांसाठी कार्यक्रम ध्वनिक्षेपित होत असतात. हे कार्यक्रम ऐकल्यावर ठिकठिकाणचीं मंडळें त्यावर चर्चा करतात आणि नभोवाणीकडे आपल्या शंका धाडतात. या शंकांना उत्तरें देण्यांत येतात.

नभोवाणी शेतकरी मंडळ

या जिल्हयांत खालील १० गांवें अखिल भारतीय नभोवाणीनें निवडलेली आहेत.—हातनी, हतेडी बु. पेठ, किन्होळा, सेलसूर, डोंगरशेवली, डोंगरखंडाळा, तोरणवाडा, नांद्राकोळी व रायपूर ही सर्व गांवें बुलडाणा विकास गटांतील आहेत.

प्रसिद्धि

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि खात्याचे जिल्हा कार्यालय बुलडाणा येथें आहे. या कार्यालया तर्फे देशांत होत असलेल्या विकासांवर आधारलेलें मनोरंजक, माहितीपूर्ण आणि उद्बोधक लघुचित्रपट दाखविलें जातात. तसेच जिल्हयांत होत असलेल्या विकास कार्याचा आढावा घेण्यासाठी मुंबईच्या मुख्य कार्यालयांतून चलत् छायाचित्रकाराला बोलावून चित्रणहि करण्यांत येते.

बुलडाणा जिल्हयांतील तपोवन येथील सहकारी शेतीच्या उद्घाटन समारंभाचे चित्रण, फेब्रुवारी १९६० मध्यें करण्यांत आलें. तसेच त्याच महिन्यांत सिंदखेड येथील ऐतिहासिक अवशेषांचेहि चित्रण केले गेलें. नळगंगा नदी प्रकल्पाचेहि चित्रण झालेले आहे.

विविध कार्याची प्रगति व खात्यांची माहिती, हस्त-पत्रिका, भिंती-फलक, इत्यादि साधनांच्या साह्याने खेडयापर्यंत पोहचविली जाते.

प्रसिद्धि विभागातर्फे जिल्हयांत होत असलेल्या कार्याची माहिती वृत्तपत्रांना पोहचविली जाते व पत्रकारांचे विकास विभागांत दौरे आयोजित केले जातात. ह्याशिवाय लोकशिक्षणाचेहि कार्यक्रम करण्यांत येतात. प्रसिद्धि संचालनालयाने काढलेली पुस्तकें, मासिकें व इतर साहित्यांचा प्रसार करण्यांत येतो.

माहिती केन्द्र

प्रसिद्धि कार्यालयाला जोडूनच माहिती केन्द्र ठेवण्यांत आले आहे. जिल्हयांत झालेल्या राष्ट्रोन्नतीच्या कार्याच्या प्रगतीचें माहिती-फलक व प्रतिकृति (मॉडेल) छायाचित्रा-द्वारें केन्द्रात ठेवली आहे.

सामुदायिक श्रवण

माहिती केन्द्रांत येणाऱ्या प्रेक्षकांचे मनोरंजन व लोकशिक्षण साधावे म्हणून रेडीओ ठेवण्यांत आला आहे. या रेडिओ वरून ग्रामीण भागासाठी असलेले कार्यक्रम, प्रादेशिक तथा अखिल भारतीय बातमीपत्र, निरनिराळे लोक शिक्षणात्मक कार्यक्रम ऐकविले जातात.

ग्रामीण परिसारण योजना

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि खात्यातर्फे या जिल्हयांत ग्रामीण परिसारण योजना (रूरल ब्रॉडकास्टिंग) सुरू करण्यांत आली असून बुलडाणा यथ प्रभारी तंत्रज्ञाची कचेरी आहे. या योजनेमार्फत ग्रामपंचायतीला अगर सहकारी संस्था किंवा नगरपालिका या सारख्या जबाबदार संस्थांना रेडिओ पुरविण्यांत येतात. रेडीओ बसविण्यासाठी आरंभी १७५ रुपये वर्गणी व त्याचा एक वर्षाचा दुरुस्ती व विजेरीचा (बटरीचा) खर्च ६० रुपये भरावा लागतो व त्यानंतर प्रतिवर्षी फक्त ६० रुपये भरावे लागतात. रेडीओसाठी लागणारा

दाखला सरकारतर्फे काढण्यांत येतो. या विभागातर्फे या जिल्ह्यांत आतापर्यंत १९६ रेडीओ बसविण्यांत आले आहेत :—

(१) मलकापूर तालुका—५४.
(२) मेहेकर तालुका—३८.
(३) चिखली तालुका—५६.
(४) खामगांव तालुका—३५.
(५) जळगांव तालुका—१३.

जिल्ह्यांतील प्रसिद्ध घराणीं

या जिल्ह्यांत, जाधव, यादव, देशमुख, देशपांडे, लाड, सावजी व पाटील ही प्रसिद्ध घराणीं समजण्यांत येतात.

वृत्तपत्रें आणि नियतकालिकें

इतर जिल्ह्यांशी तुलना करतां ह्या जिल्ह्यांत वृत्तपत्रें व नियतकालिकें बरीच कमी आहेत. या जिल्ह्यांत 'निनाद' नांवाचें एक साप्ताहिक असून ते खामगांव येथून दर गुरुवारी प्रसिद्ध होते. १९४७ पासून हे साप्ताहिक प्रसिद्ध होत आहे.

संस्कार केन्द्रें

दारुबंदीचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी व गांवांतील दारू सोडलेल्या इसमांच्या करमणुकीसाठी आसलगांव व डोणगांव या दोन ठिकाणीं १५ फेब्रुवारी १९५८ पासून संस्कार केन्द्रें स्थापन करण्यांत आलीत. ह्या केन्द्रांत करमणुकीसाठी रेडीओ, वर्तमानपत्रें व बैठे खेळ ठेवण्यांत आले आहेत. तसेच दारुबंदीच्या प्रसारासाठी या जिल्ह्यांत २२ ऑक्टोबर १९५८ पासून दारुबंदी प्रचार अधिकारी यांची नेमणूक करण्यांत आली आहे. शेगांव येथे संस्कार केंद्रें नुकतेच उघडण्यांत आले.

प्रमुख यात्रा

देऊळगांव राजा येथें अश्विन पौर्णिमेला बालाजीची फार मोठी यात्रा भरते. जवळ जवळ ३० ते ४० हजार लोक यात्रेला जमतात. या देवालयाचें वार्षिक उत्पन्न कांही लाख रुपये आहे असे सांगतात.

पिंपळगांव सराई.—येथें फाल्गुन वद्य पंचमीला देवीची मोठी यात्रा भरते. साधारणत: १० हजार लोक यात्रेला जातात.

मायंबा.—पिंपळगांव सराईच्या पश्चिमेस अंदाजें ३ मैलांवर असलेल्या मायंबा येथे पौष अमावास्येला नवनाथाची यात्रा भरते. ही यात्रा साधारणत: १५ दिवस चालते. १० ते २० हजार लोक या यात्रेला जातात.

शेगांव.—रामनवमीला व चैत्र शुद्ध पंचमीला गजानन महाराज प्रित्यर्थ मोठ्या यात्रा भरतात. ३०,००० पर्यंत लोक यात्रेस जातात.

नागझरी.—चैत्र शुद्ध पंचमीला गोमाजी बुवाची यात्रा भरते.

मच्छिन्द्र खेड.—माटरगांवच्या पूर्वेस दोन मैलांवर असलेल्या या गांवी गुडीपाडव्याला आसरा देवीची यात्रा भरते.

पिंपळगांव नाथ.—चैत्र शुद्ध १२ ला महादेवाची यात्रा भरते.

सोनारी.—पौष अमावस्येला महिनाभर खंडोबाची यात्रा भरते.

फत्तेखेर्डा.—येथें पौष पौर्णिमेला खंडोबाची यात्रा भरते.

वानोरा.—येथें माघ पौर्णिमेला यात्रा भरते. १० हजार जवळ जवळ यात्रेकरू जमतात.

सोनाळा.—कार्तिक पौर्णिमेला सोनबाबाची यात्रा.

इटखेड.—चैत्र पौर्णिमेला दत्ताची यात्रा भरते.

सार्वजनिक बांधकाम. बुनियादी प्रशिक्षण महाविद्यालयाच्या इमारतीचें काम पूर्ण झालेलें असून त्यावर ५,६२,५०२ रुपये खर्च झाले. ग्रामसेवक प्रशिक्षण केन्द्राचें काम सुरू आहे.

मागच्या वर्षी खालील बांधकाम पूर्ण झाले :—

(१) पोलीस सब-इन्स्पेक्टर्स करितां बुलडाणा येथें राहाण्यासाठी २ गृहें.

(२) परिचारीकांसाठी ४ गृहें.

(३) पोलीसांसाठी १८ गृहें.

खामगांव येथें पोलिसांसाठी १४ गृहें बांधण्यांत आली असून खालील बांधकाम सुरू आहे :—

(१) ६० पोलिस गृहें, बुलडाणा.

(२) २२ पोलिस गृहें, मेहकर.

(३) २ सब-इन्स्पेक्टर गृहें, बुलडाणा.

(४) १ पोलिस सब-इन्स्पेक्टर गृह, खामगांव.

बँका या जिल्हयांत स्टेट बँक, को-ऑपरेटिव्ह बँक, महाराष्ट्र बँक, सेंट्रल बँक, पंजाब नॅशनल बँक, इत्यादि बँका प्रमुख ठिकाणीं आहेत.

तसेच शासकीय अर्थ व्यवस्थेसाठी बुलडाणा येथें सदर ट्रेझरी असून मलकापूर, चिखली, खामगांव, जळगांव व मेहकर येथें सब-ट्रेझरी आहे.

प्रमुख बाजार पेठा (१) **चिखली तहसील**.—बुलडाणा—रविवार, देऊळगांव राजा— शनिवार, चिखली—सोमवार आणि म्हसाला बु.—बुधवारी बाजार भरतो.

(२) **खामगांव तहसील**.—खामगांव—गुरुवार व शेगांवला मंगळवारी बाजार भरतो.

(३) **मलकापूर तहसील**.—मलकापूर—शनिवार, नांदुरा—सोमवार, मोताळा—गुरुवार आणि जवळा बाजार व शेलगांव बाजार येथेहि बाजार भरतो.

(४) **मेहकर तहसील**.—या तहसिलींत जानेफळ, मलकापूर पांग्रा, डोणगांव, मेहकर, इत्यादि ठिकाणीं बाजार भरतो.

(५) **जळगांव तहसील**.—आसलगांव, जळगांव आणि पातुर्डा या ठिकाणीं बाजार भरतो.

स्थायीक चित्रपटगृहें खाली दिलेल्या गांवी आहेत. संख्या येथील चित्रपट-गृहें दर्शविते.—

चित्रपटगृहें :—बुलडाणा—२; खामगांव—३; चिखलीं—१; देऊळगांव राजा—१; नांदुरा—२; मेहेकर—१; शेगांव—२ व जळगांव—१. याशिवाय बुलडाणा येथे नाटक व विविध कार्यक्रमासाठी टिळक क्रिडा नाटचमंदिर बांधले आहे.

समाज कल्याण कलापथक विभागातर्फे येथे एक सात इसमांचा संच असलेले कलापथक आहे. ह्या कलापथकाने महाराष्ट्राचा दौरा केला असून दिल्लीला गणराज्य दिनाप्रीत्यर्थ १९६० सालीं कार्यक्रम दिला होता. हे कलापथक मनोरंजनाबरोबरच निरनिराळ्या शासकीय योजनांचाहि प्रचार करते.

बुलडाणा येथे विश्रामभवन आणि विश्रामगृह आहे. मलकापूर येथे दोन विश्रामगृहें आहेत. बुलडाणा आणि मलकापूर येथील विश्रामगृहांत जागा राखून ठेवण्यासाठी, व उतरण्याविषयीं उपविभाग पदाधिकारी, लोक कर्म विभाग, बुलडाणा, ह्यांना लिहावें. लोणार, मेहेकर, चिखली, लव्हाळा डोणगांव, देऊळगांव राजा, देऊळगांव मही, अमडापूर येथे असलेल्या विश्रामगृहासाठी उपविभाग पदाधिकारी, लोक कर्म विभाग, मेहेकर, ह्यांना लिहावें. खामगांव येथे विश्रामभवन आणि विश्रामगृह आहे. शेगांव, बावनबीर, खिरोडा, नांदुरा व जळगांव येथील विश्रामगृहासाठी, खामगांव येथील उपविभाग पदाधिकारी (लोक कर्म विभाग) यांच्याकडे चौकशी करावी. शिवाय बुलडाणा, चिखली, खामगांव, मलकापूर व शेगांव येथे लॉजेस आहेत.

विश्रामगृहें

जंगल भागांत वन विभागाची कांहीं विश्रामगृहें आहेत. त्याठिकाणीं वन विभागांतील कर्मचाऱ्याशिवाय इतरांना उतरतां येत नाही. परंतु विशेषप्रसंगी अगोदरच विभागीय वन अधिकारी, आकोला, किंवा उपविभाग पदाधिकारी (वन विभाग), बुलडाणा, यांना लिहिल्यास, उतरतां येते. तसेच जनपदांच्या सराया लोणार वगैरे ठिकाणी आहेत.

(२०) कोणाकडे कशाची चौकशी करावी?

कामाचें नांव (१)	संबंधित अधिकारी (२)
१. तकावी कर्ज, लोखंड, सिमेंट, साखर व अन्नधान्य आणि महसूल खात्याच्या सर्व बाबीसाठी.	जिल्हाध्यक्ष, बुलडाणा, व तालुका पातळीवर, उपविभाग पदाधिकारी व तहसिलदार.
२ जमिनीच्या भू-संरक्षण कार्यक्रमासंबंधी ...	उपविभाग पदाधिकारी (भू-संरक्षण), बुलडाणा.
३ शेती सुधारण्याची पद्धत, रासायनिक खतें, सुधारलेली बी-बियाणें, औजारे, किटक नाशक औषधी, ट्रॅक्टरने जमीन नांगरून घेण्यासाठी, फलोत्पादन इ.	जिल्हा कृषि अधिकारी, बुलडाणा, व गटाच्या पातळीवर, संवर्ग विकास अधिकारी.
४ पीक-स्पर्धा व कृषिसंवर्धन	अध्यक्ष, जिल्हा विकास मंडळ, बुलडाणा व जिल्हा कृषि अधिकारी, बुलडाणा.
५ खरीप व रब्बी मोहिमेसाठी तसेच उन्हाळी पीकांसाठी.	जिल्हा कृषि अधिकारी, बुलडाणा.
६ कुक्कुट पालन व दुध-दुभत्याचा धंदा ...	जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, बुलडाणा, व गटाच्या पातळीवर, संवर्ग विकास अधिकारी.
७ गुरांचे रोग व कृत्रिम रेतनाने पशू उत्पादनासाठी.	जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, बुलडाणा.
८ सहकारी संस्थेच्या स्थापनेसंबंधी कार्यप्रणाली व सहकारी संस्थेसंबंधी व इतर माहितीसाठी.	जिल्हा उप-पंजीयक, सहकारी संस्था, बुलडाणा, व गट पातळीवर, संवर्ग विकास अधिकारी.
९ शिक्षण संस्थांची स्थापना, कार्य आणि त्यासंबंधी माहिती.	जिल्हा शाळा निरीक्षक, बुलडाणा, व शिक्षणाधिक्षक, पश्चिम विदर्भ विभाग, अकोला.
१० आर्थिक दृष्टचा मागासलेल्या वर्गांतील पालकांच्या बालकांना मिळणाऱ्या शैक्षणिक सवलतीसंबंधी व मागासलेल्या जातींतील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सवलती.	समाज कल्याण अधिकारी, बुलडाणा, व जिल्हा शाळा निरीक्षक, बुलडाणा.
११ नळगंगा नदी प्रकल्पाची माहिती, पाणी वांटप इत्यादि संबंधी.	कार्यपाल यंत्री, नळगंगा नदी प्रकल्प, मलकापूर व जिल्हा कृषि अधिकारी, बुलडाणा.
१२ ग्रामीण भागांतील लहान उद्योगधंदे, त्यांना मिळणारे सहकारी सहाय्य व मार्गदर्शन, वैयक्तिक कलाकारांना सहाय्य.	जिल्हा अधिकारी, कुटीरोद्योग, बुलडाणा.
१३ ग्रामपंचायतींना मार्गदर्शन	जिल्हा पंचायत अधिकारी, बुलडाणा व गटाच्या पातळीवर संवर्ग विकास अधिकारी.

	कामाचें नांव (१)	संबंधित अधिकारी (२)
१४	नोकरी मिळण्यासंबंधी, नांव दर्ज करण्यासंबंधी व शिक्षणक्रमाच्या मार्गदर्शनासाठी.	उद्योग विनिमय केन्द्र, बुलडाणा.
१५	रस्ते व पूल बांधणीसंबंधी	कार्यपाल यंत्री (रस्ते व इमारती), बुलडाणा.
१६	बंधारे बांधण्यासंबंधी माहिती ...	उपविभाग पदाधिकारी (सिंचन), बुलडाणा, व संवर्ग विकास अधिकारी.
१७	प्रवाशांची विश्रामगृहें व त्यांत जागा राखून ठेवण्यासंबंधी.	त्या विभागांतील उपविभाग पदाधिकारी (लोककर्म विभाग) (पान ४२ पहा).
१८	ग्रामीण रेडियो ग्रामपंचायतीला मिळण्यासाठी.	प्रभारी तंत्रज्ञ, ग्रामीण रेडिओ, प्रसिद्धि विभाग, बुलडाणा.
१९	लोक स्वास्थ्याच्या कार्यक्रमासंबंधी आणि उपचारासंबंधी.	प्रमुख चिकित्सक, बुलडाणा, व जिल्हा स्वास्थ्य अधिकारी, बुलडाणा.
२०	क्षयरोग आरोग्यधामांत प्रवेश मिळविण्यासंबंधी.	अधिक्षक, क्षयरोग आरोग्यधाम, बुलडाणा.
२१	मलेरिया निर्मूलन व डी. डी. टी. फवारणें.	मलेरिया आरोग्य अधिकारी, बुलडाणा.
२२	ग्रामसेवक प्रशिक्षणासंबंधी	प्राचार्य, ग्रामसेवक प्रशिक्षण केन्द्र, बुलडाणा.
२३	बुनियादी प्रशिक्षण महाविद्यालयांत प्रवेश मिळविण्यासाठी.	जिल्हा शाळा निरीक्षक, बुलडाणा, व प्राचार्य, बुनियादी प्रशिक्षण महाविद्यालय, बुलडाणा.
२४	सर्वोदयासंबंधीची माहिती	संचालक, सर्वोदय योजना, टिळक राष्ट्रीय विद्यालय, खामगांव.
२५	ग्रामीण भागांत विद्युत् घेण्यासाठी ...	सहाय्यक स्थापत्य विशारद, महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळ, खामगांव.
२६	वन विभागासंबंधी माहिती	उपविभाग पदाधिकारी (वन), बुलडाणा.
२७	गांवांत टपाल कचेरी सुरू करण्यासंबंधी.	अधिक्षक, टपाल कार्यालय, अकोला.
२८	ग्राम संरक्षक दलासंबंधी	जिल्हा अधिकारी, होमगार्डस्, बुलडाणा.
२९	जिल्ह्यांतील पोलिस यंत्रणा ...	जिल्हा पोलिस अधिक्षक, बुलडाणा.
३०	योजनाद्वारे विविध खर्चासंबंधी माहिती.	जिल्हा आंकडेशास्त्र अधिकारी, बुलडाणा.
३१	ग्रामीण विभागांतील रस्ते, आरोग्य व शिक्षण.	अध्यक्ष, जनपद सभा.
३२	अल्पबचत योजनेसंबंधी माहिती ...	अल्पबचत मामलतदार, जिल्हा कार्यालय, बुलडाणा, व टपाल कार्यालय.
३३	माजी सैनिकाच्या हित-प्रश्नासंबंधी ...	जिल्हाध्यक्ष व अध्यक्ष, जिल्हा माजी सैनिक मंडळ, बुलडाणा.
३४	हौशी प्रवाशांची आकर्षणें व त्या संबंधीची माहिती.	जिल्हा प्रसिद्धी अधिकारी, बुलडाणा.

	कामाचें नांव (१)	संबंधित अधिकारी (२)
३५	जिल्हा विकास कामासंबंधी	जिल्हा विकास मंडळ, बुलडाणा.
३६	जिल्ह्यांतील विविध योजनांची माहिती, प्रसिद्धि खात्यातर्फे प्रकाशित झालेली पुस्तकें, आदिसाठी.	जिल्हा प्रसिद्धि अधिकारी, बुलडाणा.
३७	दारुबंदी संबंधी माहिती	जिल्हा अधिक्षक, दारुबंदी, बुलडाणा.
३८	शेतीची मोजणी करून घेण्यासाठी ...	तहसिलदार किंवा अधिक्षक, भू-अभिलेख, बुलडाणा.
३९	सेल्स-टॅक्स संबंधी	सेल्स-टॅक्स अधिकारी, खामगांव.
४०	लांच-लुचपतखोरीला प्रतिबंध करण्यासंबंधी माहिती.	अँटी-करप्शन इन्स्पेक्टर, बुलडाणा
४१	सावकारी लायसन्ससाठी	जिल्हा उप-पंजीयक, बुलडाणा.

GPN—J-837—RPON—18-6-62—5,000+22.